# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००४ |
| वर्ष | : | पाचवे |
| अंक | : | १२ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ८७**

MAHMAR 19356/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष पाचवे / अंक १२ / नोव्हेंबर २००४

## संपादकीय

## गीताई माउली माझी

समाजाला चिरस्थायी अशा मूल्यांची नितांत गरज असते. किंबहुना अशा चिरंतन मूल्यांच्या आधारेच समाजाचे अस्तित्व टिकत असते. अशी चिरकाल टिकणारी मूल्ये देण्याची प्रचंड क्षमता ग्रंथांमध्ये असते. व्यक्ती देहस्वरुपाने मृत्यू पावेल, पण तिचे चित्स्वरुप विचार एका पिढीकडून दुसरीकडे नेण्याचे काम केवळ ग्रंथच प्रभावीपणे करतात. या महिन्यात देशभर पाळला जाणारा 'ग्रंथालय सप्ताह' हा ग्रंथांचे प्रचंड ऋण व्यक्त करण्याची संधी आहे. कितीही माध्यमे विकसित होवोत, संप्रेषण गतिमान होवोत, ग्रंथांचे महत्त्व कालातीत आहे. असे नसते तर बायबल, कुराण, ग्रंथसाहिब, गीता या ग्रंथांची पारायणे कधीच थांबली असती. ज्ञानेश्वरी, एकनाथांची भारुडे, नामदेवगाथा, तुकारामांचे समाजाचे चित्र असणारे अभंग या केवळ इतिहासात विरलेल्या गोष्टी ठरल्या असत्या. पण तसे झाले नाही. चंगळवादाच्या प्रवाहात वहात जाणारी माणसे पश्चातापाच्या एखाद्या क्षणी तुकाराम गाथा घेतात आणि जीवनच बदलवून टाकतात. संपूर्ण जीवन, व्यक्तिमत्त्व बदलण्याची ही शक्ती या ग्रंथांच्या वाचनात असते.

हे सांगायचे कारण म्हणजे जे पुस्तक वाचता वाचता आम्ही लहानाचे मोठे झालो त्या विनोबांच्या गीताईचे हे अमृतमहोत्सवी वर्ष आहे. ज्या घरात ज्ञानेश्वरी, दासबोध, गीताई, माझी जन्मठेप यांसारखी पुस्तके नसतील, ती सातत्याने वाचली जात नसतील, त्यावर संवाद होत नसतील अशा घरास मराठी घर म्हणावे का, का म्हणावे याचं उत्तर स्वतःच स्वतःशी द्या.

गीतेचा इतक्या साध्या सोप्या मराठीत अनुवाद असावा हेच मराठीच्या भाषा गौरवाचे चिन्ह आहे. गीता+आई! गीतेला आईच्या बरोबरीचे स्थान विनोबांनी दिले आहे. या छोट्या ग्रंथाच्या आवृत्त्या नियत राहतात याचा अर्थ वाचणारे आजही आहेत ! एखाद्या ग्रंथाचा वाढदिवस करण्याचा विचार आमच्याच संस्कृतीत दिसेल. पुढील महिन्यात ११ डिसेंबरला येणाऱ्या गीता जयंतीच्या उदाहरणावरून बघा. आता गीताईही आमच्या संस्कृतीतील अविभाज्य ग्रंथ झाला आहे. विनोबांचे गीताप्रवचने, स्थितप्रज्ञ दर्शन, मधुकर..... या सर्व ग्रंथांनी विचार वैभव समाजाला दिले आहे. इंटरनेट मुळे ग्रंथ संस्कृती धोक्यात आली. नष्ट झाली/ होणार याबद्दल बोलणारे काहीही म्हणोत जगभरचा वाढता ग्रंथव्यवहार पाहता असे म्हणणे दिशाभूल करणारे आहे.

मनःपरिवर्तनासाठी गीताईचे वाचन प्रत्येक मराठी माणसाने करावे. या निमित्ताने एक निरीक्षण समाधान देऊन गेले, विधानसभेच्या वृत्तगर्दीतही अनेक मराठी वृत्तपत्रांच्या अग्रलेखांनी गीताईचे स्मरण ठेवले. विनोबा म्हणत त्या प्रमाणे 'शंभर माणसांमागे एकाने तरी गीताई वाचावी' आज शंभराचे प्रमाण दहा करायला काय हरकत आहे? आमची तेवढी प्रगती झाली आहेच की !




वर्ष पाचवे / अंक १२ / नोव्हेंबर २००४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ९ वे / अंक ५ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री ज्ञानेश्वर महाराज यांचे जीवन व कार्य (लेखांक दुसरा) | शं. बा. मठ | ३ |
| २) | डॉ. मो. दि.पराडकर यांचे आत्मकथन | डॉ. मो. दि.पराडकर | १० |
| ३) | महाबलिपुरम येथील रथमंदिरे | सौ. मंजिरी दांडेकर | १९ |
| ४) | ज्ञानक्षेत्रातील साम्राज्यवाद | यशवंत साने | २२ |
| ५) | जागो भारत | | ३० |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | ३३ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# श्री ज्ञानेश्वर महाराज यांचे जीवन व कार्य (लेखांक दुसरा)

*ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनकार्याचा तत्कालिन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर परिचय करून देणारी लेखमाला*

*- संपादक*

## ब्रह्मवृंदांनी देहान्त प्रायश्चित सांगितले

विठ्ठलपंतांनी ब्रह्मवृंदाना विनंती केली पण या विनंतीचा आळंदीच्या ब्रह्मवृंदावर कसलाही परीणाम झाला नाही. त्यांनी स्पष्ट सांगितले आपल्या घोर अपराधाबद्दल शास्त्रात कोठेही प्रायश्चित्त नाही व देहान्ताखेरीज आपण यातून मुक्त होणार नाही. विठ्ठलपंतांनी त्यांचा निर्णय शिरसावंद्य मानला आणि ते अंमलात आणण्याची तयारी दाखविली. त्यांना वाटले आपल्या देहदंडाने ब्रह्मवृंदांना पुढे दया आली तर आपली चिंता फिटेल. मुलांच्या मुंजी होतील व कुळ पावन होईल.

## दांपत्याचे महानिर्वाण

उभयतांनी तात्काळ देहान्त प्रायश्चित्त घ्यावे हा एकच ध्यास त्यांना लागला. एकेदिवशी प्रहर रात्र उलटून गेल्यावर विठ्ठलपंतांनी आपला मनोदय पत्नीला सांगितला. तिने त्वरीत निर्णय घेतला. ती म्हणाली, मला आपल्याविना कसला लोभ नाही. मीही तुमच्याबरोबर येते. बिचाऱ्या बालकांना कसलीच कल्पना नव्हती. ती झोपली होती. दोघांनीही मुलांना आशीर्वाद दिले. कठोर हृदयाने ते घराबाहेर पडले. बाळा निवृत्ती धाकट्या भावंडांची नीट काळजी घे असे म्हणून ती दोघे महायात्रेला निघून गेली. दुसऱ्या दिवशी बालकांना समजले. निवृत्तीने त्यांचा सांभाळ केला.

## नाथ संप्रदायाबद्दल थोडेसे

आदिनाथ शंकर हे या संप्रदायाचे कुलगुरु होत. आदिनाथाचे मुख्य शिष्य मत्स्येन्द्रनाथ. त्यांचे शिष्य गोरक्षनाथ, गोरक्षांचे गैनीनाथ, गैनीनाथांचे निवृत्तीनाथ, निवृत्तीनाथांचे शिष्य ज्ञाननाथ (ज्ञानदेव) होत. निवृत्तीनाथ एका अभंगात म्हणतात -

आदिनाथ उमाबीज प्रगटले । मत्स्येन्द्रा लाधले सहजस्थिती । १

तेचि प्रेम मुद्रा गोरक्षा दिधली । पूर्ण कृपा केली गैनीनाथा । २

वैराग्ये तापला सप्रेमे निवाला । हेवा जो लाधला शांतिसुख । ३

निर्द्वंद्व नि:शंक विचरतामही । सुखानंद हृदयी स्थिर झाला । ४

विरक्तीचे पात्र अन्वयाचे सुख । देऊनी सम्यक् अनन्यता । ५

निवृत्ती गुरुनी कृपा केली पूर्ण । कुळ हे पावन कृष्ण नामे । ६

निवृत्ती नाथांनी ज्ञानदेवावर कृपा केली त्याचा उल्लेख ज्ञानेश्वरीत आढळतो (अ.१८)

ते क्षीरकल्लोळा आंत । मकरोदरी गुप्त ।<br>होता तयाचा आत । पैठे जाले । १७५३

आधीच तव तो कृपाळू । वरि गुरु आज्ञेचा बोलु<br>जाला जैसा वर्षाकाळु । खवळणे मेघा । १७६१

मग आर्ताचेनी ओरसे । गीतार्थग्रथन मिसे ।
वर्षला शांत रसे । तो हा ग्रंथ । १७६२

निवृत्तीनाथांनी शांति रसाचा जो वर्षाव केला तो हा भावार्थ दीपिका ग्रंथ होय.

नाथ सांप्रदाय हा वैष्णव सांप्रदायच होय. आदिनाथ शंकर हे गुरु. नाथांनी भक्तमालेत चार वैष्णव सांप्रदाय सांगितले आहेत. १) रामानुज २) विष्णुस्वामी ३) निंबादित्य ४) मध्वाचार्य.

रामानुजाचार्य सांप्रदायाचा मूळ उपदेश रमापतीने रमेस दिला. तेव्हा रमापति या सांप्रदायाचा आदि गुरु. या सांप्रदायाला श्रीपद्धति म्हणतात. विष्णु स्वामीच्या सांप्रदायास प्रकाश संप्रदाय हे नाव आहे. त्याचा आदिगुरु त्रिपुरारी म्हणजे शंकर. निंबादित्य संप्रदाय स्वरूप सांप्रदाय त्याचा आदिगुरु सनक आहे. मध्वाचार्य संप्रदाय चैतन्य सांप्रदाय त्याचा आदिगुरु ब्रह्मदेव. या माहितीला पद्मपुराणात आधार आहे.

कलौ खलु भविष्यति चत्वार: संप्रदायिन: ।
श्री माध्वी रुद्र सनका: वैष्णवा: क्षितिपावना: ।
रामानुजं श्री: स्वीचक्रे मध्वाचार्य चतुर्मुख: ।
श्री विष्णु स्वामिनं रुद्रो निंबादित्यं चतुस्सन: ।

## ब्रह्मवृंदांचा निर्णय - योग्यायोग्य विवेचन

संन्यासानंतर गृहस्थाश्रमात प्रवेश करणारा ब्राह्मण पूर्वी कधी झालाच नाही. त्याला शास्त्रात प्रायश्चित्त तरी कोठून असणार. त्याला परम पतित ठरवून जबर शिक्षा दिली. राजाचे कायदे मोडणारे राजद्रोही, धर्माचे कायदे मोडणारे धर्मद्रोहीच समजले पाहिजेत. कायद्यापुढे मान वाकविणे सज्जनाचे काम आहे. त्यासाठी आपत्ती निमूटपणे भोगणे हे धैर्याचे काम. तेच परमवंद्य ठरतात. आपत्तीबद्दल वैषम्य वाटूनही उपयोगी नाही. वीर आणि भ्याड, साव आणि चोर, सच्चा आणि लुच्चा, संत आणि ढोंगी यांच्यातला फरक - आपत्तीमुळेच प्रगट होतो. नाहीतर त्यांची जगात खिचडी झाली असती.

विठ्ठलपंत आणि रुक्मिणीबाई म्हणजे मूर्तिमंत वैराग्य आणि भक्ती होत. वैराग्य आणि भक्ती यांच्या पोटी निवृत्तीनाथ, ज्ञाननाथ, सोपान, मुक्ता (निवृत्ती, ज्ञान, सोपान, मुक्ती) उद्‌भवणे ही गोष्ट अगदी सहजातली सहज आहे.

## आईवडिलांच्या पश्चात

परमेश्वरी कृपेच्या स्वाधीन करून मुलांचे, आईबाप निघून गेले. निवृत्तीनाथ दहा वर्षांचे होते. कुणीही थारा दिला नाही. निवृत्ती, ज्ञानदेव कोरान्न भिक्षेस बाहेर पडावे व सोपानदेवाने लहानग्या मुक्तास सांभाळावे. असा क्रम चालू होता. भावंडात चर्चा चालत असे. निवृत्ती हे निवृत्तच हाते. त्यांना आपला व्रतबंध झालाच पाहिजे असे वाटत नव्हते. ज्ञानदेव या बाबत आग्रही होते.

## वर्णाश्रम धर्म पाळणे आवश्यक

ज्ञानदेवांना हे अभिप्रेत होते. निवृत्ती हे शिवस्वरुप होते त्यांना यात विशेष वाटत नव्हते. ज्ञानदेव म्हणाले, वेद विहित किंवा वेद विरुद्ध आचरण याचा स्वस्वरुपी संबंध नाही हे खरे. तथापि अ-विधि आचरण दूषणास्पद अशी वेद नारायणाची आज्ञा आहे. ती आपण पाळली पाहिजे. प्रत्येकाने आपला स्वधर्म पाळला पाहिजे. त्याप्रमाणे वागले पाहिजे. हेच विहित. तोच त्याचा शुद्ध धर्म होय. स्वधर्माचार अवश्य पाळले पाहिजेत. वर्णाश्रम धर्माप्रमाणे वागून इतरांना तसे वागावयास शिकविले पाहिजे. नाहीतर समाज अनिर्बंध होऊन अनाचार माजेल. स्वरूप प्राप्ती झाली असता अशास्त्र-शास्त्रविरुद्ध वागणे अयोग्य आहे.

यद्यदाचरति श्रेष्ठ: या श्लोकावरील भाष्य असे आहे.

देखे प्राप्तार्थ जाहले । हे निष्कामता पावले
तयाही कर्तव्य असे उरले । लोका लागी । १५५

मार्गी अंधा सरिसा । पुढे देखणाही चाले तैसा ।
अज्ञाना प्रगटावा धर्म तैसा । आचरोनी । १५६

इतका उहापोह झाल्यानंतर ते तिथे मुक्तासह पैठणास गेले.

### शुद्धिपत्रासाठी पैठणला प्रयाण

ती चार भावंडे चालत चालत एकदाची पवित्र गोदातीरी पैठणला आली. आळंदिहून निघालेल्या त्याना आज पूर्ण महिना गेला. अतिशय अवघड अशा प्रवासातून आज ती इथे आली. त्यांचे मामा देवकुळे यांच्याकडे ही मुले उतरली. मोठमोठ्या विद्वानांचे पैठणात आपल्याला दर्शन होणार याने ती संतोषली. पैठण ही दक्षिणकाशी. आर्य संस्कृतीने ती झळकत होती.

आळंदिहून येताना ब्रह्मवृंदाकडून त्यानी ओळखपत्र आणले होते. ते पत्र ब्रह्मवृंदाकडे दिले. दुसऱ्या दिवशी तिसऱ्या प्रहरी नागनाथाच्या घाटावर ब्रह्मवृंदांनी बोलावून घेतले. त्या घाटावरच असलेल्या शिवालयाच्या पायरीवर अधिपति बसले होते. विद्वान मंडळी पोथ्या घेऊन आली. तो घाट स्त्री पुरुषांनी भरून गेला. निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले. संन्याशाच्या मुलांना द्विज करून घेण्यासाठी शास्त्राधार मिळेना. या मुलाना काय सांगावे हा प्रश्न त्यांच्यापुढे होता. त्यांना निवाडा करणे अवघड होऊन बसले. त्यांनी मुलांना समजावून सांगितले, बाळांनो संन्याशाच्या मुलांची मुंज करण्याला धर्मशास्त्रात विधि सांगितला नाही. प्रायश्चित्ताने तुम्हास पावन करून घेता येत नाही. तुम्ही भगवत् चिंतन करीत जा. तुमचे कल्याण होईल. हे ऐकून सर्वच भावंडाना आनंद झाला.

ऐकोनी निवृत्ती संतोषला चित्ती । धन्य तुमचे वदती तीर्थरूप ।

ज्ञानदेव म्हणे सांगाल ते मान्य । मुक्ताई सोपान आनंदली ।

### वेद वदविला

त्याचवेळी परवालीसह एक रेडा चालला होता. त्याचे नाव ज्ञान्या होते. त्याचा आत्मा व तुमचा एकच आहे का? ज्ञानदेव म्हणाले, त्याच्या व आमच्या आत्म्यात फरक नाही. एकजण म्हणाला, 'हे जर खरे असेल तर तू जसा बोलतोस तसा हा रेडा बोलेल काय?' ते ऐकताच ज्ञानदेव नम्रपणे म्हणाले, 'भूदेवा या वेदतत्वाची आपल्याला प्रचीती घ्यावी वाटत असेल तर रेडाही वेद बोलू लागेल. भूदेव आपल्या आशीर्वादाने तेही शक्य होईल.'

ज्ञानदेवानी आपला हात त्या रेड्याच्या मस्तकावर ठेवला आणि आश्चर्याची गोष्ट रेडा वेद बोलू लागला. आत्मस्वरूपाचे प्रात्यक्षिक इतके अनुपम, अद्वितीय होते की सर्व ब्रह्मवृंद लज्जित होऊन नम्रपणाने ज्ञानदेव चरणी लागले. आमचे पांडित्य अनुभूती विना आहे, आपण थोर विभूती आहात. आपणा सारख्यांना शुद्धीची जरूरी नाही. आपण कुठेही, केव्हाही, आपले इच्छेनुरुप संचार करू शकता. **ही घटना शके १२०९ माघ शु. ५ पैठणास गोदातीरी घडली.** काही दिवस सर्व मुले पैठणास राहिली.

पैठणच्या परिसरात सर्व नरनारींना आपल्या विभूतीमत्वाचा साक्षात्कार देऊन, अनेक आध्यात्मि ग्रंथाचे अवलोकन करून ही चारही भावंडे शुद्धिपत्र घेऊन तेथून निघाली.

माघे शुक्ले च पंचम्यां सर्वजित् नाम संवत्सरे -

श्रीमत् ज्ञानेश चरण युगले सुरसेविते ।
बोपदेवेन ग्रथितं शुद्धिपत्रं समर्पितम् ।

### कीर्तीसर्वत्र पसरली

ही असामान्यपणाची बातमी आजूबाजूच्या परिसरात पसरली. पैठणपासून नेवाशापर्यंतच्या सर्व गावातील

लोकांनी मोठ्या आदराने ज्ञानदेवांना ठेवून घेतले आणि जिज्ञासु, मुमुक्षु, ज्ञानपिपासू, सिद्ध अशी सर्व मंडळी त्यांचे दर्शन घेत. ही मंडळी नेवाशास येऊन पोहोचली. आता त्यांचे खरे जीवनकार्य इथून सुरू झाले.

नेवासे गाव नगर जिल्ह्यात प्रवरा नदीच्या तीरावर वसलेला आहे. नेवासे खंडोबा व नेवासे मोहिनीराज या दोहोंचे मिळून नेवासे गाव आहे. या दोनही ठिकाणी अनुक्रमे खंडोबाचे व मोहिनीराजाची मंदिरे आहेत. भगवान विष्णूने मोहिनीचे रूप घेऊन दैत्यापासून तो अमृत कलश घेतला हे ज्या ठिकाणी घडले तेच हे नेवासे स्थान. मोहिनीराज स्त्रीरूप असल्याने बांगड्या चोळी इत्यादी वेष असतो. या रूपाला महालया असेही म्हणतात. म्हणजे म्हाळसा, संत कवींनी नेवाशास महाळ्या क्षेत्र म्हटले आहे. या नेवासेक्षेत्रात निवृत्तीनाथांच्या गुरूच्या अध्यक्षतेखाली समाजाला योग्य प्रकारे मार्गदर्शक ज्ञानेश्वरी ग्रंथ झाला. ज्ञानेश्वर महाराज या ग्रंथाच्या उपसंहारात म्हणतात -

ऐसे युगी परी कली । आणि महाराष्ट्र मंडळी ।
श्रीगोदावरीच्या कूळी । दक्षिणिली । १८०३

त्रिभुवनैक पवित्र । अनादि पंचक्रोश क्षेत्र ।
जेथ जगाचे जीवन सूत्र । श्रीमहाळ्या असे । १८०४

टोके गावी प्रवरा गोदासंगम आहे.

## सच्चिदानंद बाबा -


ज्ञानेश्वर महाराज नेवाशात प्रवेश करते झाले. तो एक सती आपला मृत पतीच्या शवाभोवती आक्रोश करीत होती. महाराजांनी चौकशी केली. मृताचे नाव सच्चिदानंद असल्याचे कळले. ते चमत्कारून म्हणाले काय सत् चित् आनंद ह्याचा मृत्यू कोणी ऐकला आहे काय? त्या शवाच्या अंगावरून महाराजांनी हात फिरविला. तो मृत पुरुष जिवंत झाला. तो महाराजांना शरण आला. हा पुरुष नेवाशाचा कुलकर्णी होता. ज्ञानेश्वरीच्या अखेरीस 'सच्चिदानंद बाबा लेखुक जाहला' म्हणून जो उल्लेख आहे, तोच हा ज्ञानेश्वरीचा लेखक होय. याने पुढे ज्ञानेश्वर विजय नावाचे चरित्रपर ओवीबद्ध ग्रंथ रचिला.

## ज्ञानेश्वरी रचना -

शके १२०९ ते १२१२ या दरम्यान या तीन वर्षात ज्ञानेश्वर व भावंडे नेवासे आपेगाव व आळंदी या तीन ठिकाणी जाऊन येऊन असत. त्यावेळी ज्ञानेश्वर १५ वर्षाचे, निवृत्ती १७, सोपानदेव १३ व मुक्ता ११ वर्षांची होती.

ज्ञानेश्वरांनी आबालवृद्धांना समजेल अशा ओवीवृत्तात भगवद् गीतेचा भावार्थ सांगावयास सुरुवात केली. ते ज्ञान ऐकण्यासाठी अनेक पुण्यात्मे येत. रोज सायंकाळी गीतेच्या श्लोकावर ओवीबद्ध निरुपण करीत. हे काम साधारण दोन-अडीच वर्षे चालले. ज्ञानदेव जे सांगत ते सच्चिदानंद उतरवून घेत. जिला ज्ञानेश्वरी म्हणतो तोच हा ग्रंथ.

गीतेवर संस्कृत व प्राकृत आणि परकीय भाषातून आजपर्यंत हजारो ग्रंथ झाले आहेत. पण त्यातला एकही ग्रंथ ज्ञानेश्वरीची बरोबरी करण्यास समर्थ असा झालेला नाही. काव्य ग्रंथ म्हणून, तत्वज्ञानाचा ग्रंथ म्हणून, धर्मरहस्य प्रगट करणारा ग्रंथ म्हणून, भाषा ग्रंथ म्हणून, स्वानुभावाच्या तेजाने तळपणारा ग्रंथ म्हणून, गुरुभक्तीच्या अमृत रसाने ओथंबलेला ग्रंथ म्हणून. कोणत्याही दृष्टीने ज्ञानेश्वरीकडे पहा. त्याच्या तुलनेला दुसरा ग्रंथ नसल्याने 'अनामिका सार्थवती बभूळ' या म्हणी प्रमाणे या ग्रंथाचे अनन्य साधारणत्व सिद्ध झाले आहे.



## ज्ञानेश्वरांचे योग सामर्थ्य

आता ज्ञानेश्वरादी भावंडाचे अलौकिकत्व, त्यांच्या जीवनाचा सुगंध दश दिशांना भरून गेला. ज्ञानेश्वरांची लोकप्रियता, ख्याती सहन न होऊन काही लोक त्रास देत. त्यापैकी सावकार विसोबा चाटी आळंदी रहात होते. हा चारही भावंडाना संन्यासाची पोरे असेच समजे. ज्ञानेश्वरांच्या वाढत्या गौरवाने एकप्रकारे अनीती वाढत आहे व धर्माची हानी होत आहे असे त्याला प्रामाणिकपणे वाटत होते.

एकदा दिवाळीच्या सणात निवृत्तीनाथ मुक्ताला म्हणाले, मला मांडे करून घाल. ती लगेच परळ आण्यासाठी कुंभारवाड्याकडे गेली. वाटेत विसोबा भेटले. त्यांनी विचारल्यावरून परळ आणण्यासाठी निघाले असे तिने सांगितले. त्यानी लगेच कुंभाराना आज्ञा केली हिला कोणीही परळ देऊ नका. कुंभार सावकाराचे मिंधे मुक्ताला कोणीही परळ दिली नाही.

दादाची इच्छा पूर्ण करता येत नाही याचे तिला दुःख झाले. ज्ञानोबांना दुःखाचे कारण कळताच तिला म्हणाले, तू सारी तयारी कर. मी पुढील व्यवस्था करतो. मुक्ताने सर्व तयारी केली व तयारी झाल्याचे ज्ञानदाला कळविले. लगेच ज्ञानेश्वर ओणवे बसले, जवळ मुक्ता होती. क्षणातच ज्ञानेश्वरांची पाठ तापून सुवर्णासारखी लाल झाली. त्या तापलेल्या पाठीवर मुक्ताने भराभर मांडे भाजले. तिचे काम पूर्ण झाल्यावर ज्ञानेश्वरांनी आपल्या देहातला अग्नी शमविला. हे अलौकिक योग सामर्थ्य पाहून मुक्ताला अत्यानंद झाला. मग सर्वजण आनंदाने जेवली.

विसोबा चाटे हे बाहेरून सारे पहात होता. त्याला अनुताप झाला. त्यांनी त्यांच्या घरातील उष्ट्या पत्रावळीतले अन्नकण वेचून खावयास सुरूवात केली. त्याला तसे करताना पाहून ज्ञानदेव म्हणाले, तू गा हो सींगा खेचर। सर परता वेगेसी ।

ही वाणी ऐकताच त्याला ज्ञान प्राप्ती झाली.

ऐसी ऐकूनिया वाणी । तोचि उपदेश धरला मनी ।
परा पश्यंती मध्यमेहुनी । वैखरी परता सर तसे ।

तू वाणीच्या पलीकडे हो हे ऐकताच तो शिवभावात स्थिर झाला. त्याने सर्व लौकिक व्यापार सोडून दिला. औंढ्या नागनाथ या प्रसिद्ध शिवतीर्थावर जाऊन राहिला. विसोबाचा अधिकार वाढला. पुढे नामदेवरायांच्या गुरुत्वाचा मान ज्ञानेश्वरांनी त्यास दिला. विसोबा चाटी हेच विसोबा खेचर होत. 'गुरू माझा ज्ञानेश्वर' असे अभंग बोलू लागले. यालाच पतितोद्धार म्हणतात.

## इतर ग्रंथ रचना -

ज्ञानेश्वरी नंतर, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, हरिपाठ, योगवासिष्ठ, स्वात्मपत्र इत्यादी ग्रंथ, शेकडो अभंग इतके वाङ्मय त्यांच्या मुखातून सहज निघाले. शके १२१२ नंतर महाराजानी पंढरपूरला जाण्याचे ठरविले. नामदेवांनी पंढरपूरचा परिसर हरिनामाच्या गजरात दुमदुमून टाकला होता. त्या सत्पुरुषाची भेट घ्यावी अशी इच्छा झाली. नामदेवास बरोबर घेऊन त्याच्या सहवासात तीर्थयात्रेस निघाल्याचे ठरविले. निवृत्तीनाथांची आज्ञा घेऊन ज्ञानेश्वर महाराजांनी तीर्थयात्रेस निघण्याचा बेत निश्चित केला.

## तीर्थयात्रा

सर्व भावंडे बरोबर होती. ते प्रथम चाकण मुक्कामी आले. तेथे महिपतरावाकडे राहिले. तेथून ते पंढरपूरला निघाले. पंढरीस चार दिवस मुक्काम करून नामदेवासह पुढे निघाले. तीर्थावळीत नामदेवमहाराज त्याचे वर्णन करतात.

नामयाचे भेटी ज्ञानदेव आले । लोटांगण घातले नामदेवे ।
देऊनी आलिंगन प्रीतीच्या पडिभारे । पूजिले आदरे यथाविधि ।

ज्ञानदेवानी नामदेवरायांना तीर्थयात्रेस येण्याबद्दल विनविले.

ज्ञानदेव म्हणे तू भक्त शिरोमणी । जोडिले जन्मो नि केशव चरण ।

धन्य तुझे जन्म । धन्य तुझे कुळ ।

धन्य तुज राऊळ । जवळी वसे ।

तुझिये संगतीचे नित्य सुख घ्यावे । सार्थक करावे संसाराचे ।

ज्ञानदेव म्हणे पुरवी मनोरथ । करावे मुहूर्त प्रयाणासी।

नामदेव म्हणतात - सर्व सुख आहे मज पाडुरंगी । जावे कवळालागी कवण्या ठाया ।

विठोबाचे पायी मज काय उणे । वासनाचि मने गिळिली माझी ।

नामा म्हणे स्वामी विठोबाने पुसा । आज्ञा देईल शिरसा धरीन त्याची ।

दोघेही विठोबाकडे गेले. पंढरीनाथांनी निकाल दिला.

प्रत्यक्ष परब्रह्म मूर्ती ज्ञानेश्वर । करीतसे आदर संगतीचा।


ऐसे भाग्य जेणे सर्वस्वे साधावे । तरीच जन्माने विष्णुदासा ।

जावे स्वस्तिक्षेम यावे शीघ्रवत । करावे स्वहित कळेल तैसे ।

ही सर्व मंडळी निघाली. त्यांना मंगळवेढ्याहून चोखामेळा आरणभेंडीहून सावतामाळी येऊन पंढरीस मिळाला. कऱ्हाडचा राजा चाकणच्या महिपतरावाचा जावई, महिपतरावाच्या कन्येला दर्शन येण्याचे ज्ञानेश्वरांनी चाकण मुकामी कबूल केले होते. तिला साधुसंतांची आवड होती. रामराय अगदी विरुद्ध स्वभावाचा. तिने एक युक्ती योजली. हिरकणीचे पाणी आपल्या पाच वर्षाच्या मुलाला पाजले. सर्वत्र हाहाकार उडाला. ती स्थिर राहिली. साधूंची चरण सेवा करा तर संकट टळेल. तिने पतीला विनविले. तो गावाबाहेर संत उतरले होते तेथे गेला. त्यांच्या चरणावर मस्तक ठेविले. त्याच्या मस्तकावर हात ठेवून ज्ञानेश्वरांनी त्याला कृतार्थ केले. तो उद्धरून गेला.

**ज्ञानदेव नामदेव संवाद -**

ज्ञानेश्वरांना मनातून नामदेवरायांची परम विव्हळता पाहून आनंद होत होता. त्यांना हृदयातून त्यांची एकनिष्ठ भक्ती पाहून आनंदाच्या गुदगुल्या होत होत्या. 'तत् अर्पित अखिल आचारता । तत् विस्मरणं परम व्याकुळता । हे भक्ताचे लक्षण नारदांनी भक्तिसूक्तात केले आहे. ते अक्षरश: नामदेवांना लागू होत असे. 'पंढरी निवास जीवन माझे' हे त्यांचे सुटले नाही. ज्ञानोबांना नामदेवांच्या संवादापासून सुखानंद होत होता. ते म्हणत, 'अरे नामदेवा अशी तल्लीनता कशी रे साधावी मला सांग.' नामदेव म्हणत - नव्हे बहुश्रुत, नव्हे ज्ञानशील । दास मी दुर्बळ वैष्णवांचा । एवढे भाग्य कैसे मज जाणिवेचे । तुमच्या पुढे मी काय बोलावे. ज्ञानेश्वर म्हणाले - मनी शंका न ठेवता आपला सुखानुभव बोला. नामदेव म्हणाले - नाम संकीर्तन वाटे मज गोड । येर ते काबाड वायाची वा । अखंड हृदयी तेचि आठवण । साजिरे



समचरण विटेवरी । सर्वभावे एक विठ्ठलचि ध्याये । सर्वभूती पाहे रूप त्याचे । सर्वाहुनी निराळा रज तमा वेगळा । भोगी प्रेमकळा तेचि भक्ति । काया वाचा मने हा माझा अनुभव । सांगितला सर्व आवडीचा । नामा म्हणे हेही बोलविले तेणे । उदार सर्वज्ञ पांडुरंगे । हे ऐकून ज्ञानेश्वर रोमांचित झाले. त्याचे बोलणे नित्य ऐकत रहावे असे वाटते.

एके दिवशी तेर गावी आले. तेथे गोरोबा कुंभार रहात होते. त्यांनी सर्वांचे आतिथ्य केले. नामदेव पूर्ण सगुणभक्त, सर्वात्म भावाचा उदय व्हावयाचा होता. गोरोबाच्या घरी मंडळी थडविण्याची हत्यारे होती. मुक्ता म्हणाली, काका माणसे ही ईश्वरनिर्मित मडकीच आहेत. ही थापटून बघा पक्की कोणती आहेत. गोरोबा सर्वांना थापटून नामदेवाकडे आले. नामदेवांना आवडले नाही, त्यांनी तसे करू दिले नाही. मुक्ता म्हणाली, काका हे मडके कच्चे आहे. पुढे पंढरीस पांडुरंगाकडे नामदेवांनी रदबदली केली. विसोबा खेचराकडून त्यांना ज्ञानप्राप्ती झाली.

ती सर्व मंडळी गोरोबांचा निरोप घेऊन औंढ्या नागनाथाला आली. तिथे अभिषेकाची वेळ होती. म्हणून तेथील ब्राह्मणांनी कीर्तन देवळाच्या पिछाडीस करावयास सांगितले. महादेवांनी कीर्तनाकडे तोंड केले. अद्याप तिथे नंदिकेश्वर शंकराच्या पाठी मागेच आहे. देव प्रेमाला साद देतो. ही मंडळी सातपुडा पर्वत आली. तिथे हरपाळ नावाचा भिल्ल होता. तो पंढरीनाथाचा भक्त होता. या सर्वांना त्यांनी सांभाळले. धारपर्यंत त्यांनी सर्वांना आणून सोडले. तेथून उज्जयनीस आले. वीर मंगल नावाचा ज्योतिषी रामानंदाच्या सांगण्यावरून सात वर्षे ज्ञानदेवाची वाट पहात होता. ज्ञानदेवाची भेट झाली. त्यांच्या चरणी मस्तक ठेवून सद्‌गतीला प्राप्त झाला.

ज्ञानेश्वर प्रयागला गेले तेथे त्रिवेणी संगमावर स्नान करून भारद्वाज आश्रम पाहून काशीला गेले. तेथे मणिकर्णिका घाटावर मुद्‌गलाचार्य मोठा यज्ञ करीत होते. अग्रपूजेचा मान हत्तीण ज्याच्या गळ्यात माळ घालील तो योग्य असे ठरले. त्या हत्तीणीने ज्ञानदेवाच्या गळ्यात माळ घातली. यज्ञाचा प्रसाद काशी विश्वेश्वरांनी स्वत: ज्ञानेश्वरांच्या हातून भक्षण केला. त्या घाटावर निवृत्तीनाथांना मत्स्येंद्रनाथ, गोरक्षनाथ व दत्तात्रेय यांचे दर्शन झाले.

तेथून गया अयोध्या गोकुळ वृंदावन द्वारका गिरनार इत्यादी तीर्थे हिंडत मारवाडात आले. एके दिवशी नामदेव व ज्ञानदेव यांना तहान लागली. मरुभूमी विहीर खूप खोल. दोर पण नाही. लघिमा सिद्धीचा आश्रय करून ज्ञानदेव खाली उतरून पाणी पिऊन आले. नामदेवांनी विठोबाला साकडे घातले. ती विहीर पाण्यांनी तुडुंब भरली. नामदेव पाणी पिऊन तृप्त झाले. आजही 'नामदेव कुवा' म्हणून ती विहीर प्रसिद्ध आहे.

तीर्थयात्रा संपवून संतमंडळी पंढरपूरला परतली. पंढरपुरात मावंदे केले. मावंदे संपल्यावर सर्व संत आपआपल्या ठिकाणी गेले. ज्ञानेश्वर महाराज आपल्या भावंडासह आळंदीस परतले.

(क्रमश:)

शं. बा. मठ
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
ठाणे ४०० ६०२.

•••



# डॉ. मी. दि.पराडकर यांचे आत्मकथन



भाग -६

पालघरच्या सुरुवातीच्या काही वर्षांच्या काळात मला मंडळाच्या सर्व कार्यकारिणीचा विश्वास मिळाला. मंडळाच्या कार्यकारिणीमधे आजच्या पक्षांच्या भाषेत बोलायचं झालं, तर अध्यक्ष भोगीलाल शहा हे काँग्रेसचे होते आणि कार्यकारिणीत त्यांचेच चिरंजीव नवनीतभाई शहा हे समाजवादी होते. परंतु मागे सांगितल्याप्रमाणे स्वातंत्र्यसेनानी आचार्य भिसे यांच्या शिफारशीमुळे मला या पक्षांच्यामधल्या मतभेदांचा उपसर्ग प्रारंभीच्या दोन-चार वर्षात झाला नाही. किंबहुना सुरुवातीच्या वर्षात तर त्यांना योगायोगानं समाजात मी मिळवलेल्या आपुलकीचा प्रत्यय आला. बरीच वर्ष झाल्यामुळे सर्व गोष्टी आठवत नाहीत आणि यात माझ्याबद्दल आपुलकीचा भाग थोडा जास्त असल्यामुळे फार सांगणंही बरोबर नाही. पण मला एक प्रसंग आठवतो सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळानं स्वर्गीय सोनोपंत यांच्या स्मृतीनिमित्ताने स्थापलेलं आमचं कला महाविद्यालय पालघर स्थानकापासून जवळजवळ दोन-दोन मैल लांब होतं आणि आमचे विद्यार्थी निरनिराळ्या ५५-५७ गावांमधून पालघरला शिकण्यासाठी येत असत. या विद्यार्थ्यांना मुळात त्यांच्या गावच्या बसस्थानकावर येण्यासाठी चालावं लागत असे आणि त्या बसस्थानकावर येऊन पालघरची बस गाठायची. पालघरला आमचं कॉलेज जवळ नसल्यामुळे एक मधे तरी उतरायचं बोईसरनंतर किंवा मग पालघरला उतरुन कॉलेजला यायचं. त्यामुळे आता आम्हाला कॉलेजची बस मिळायला हवी असा साहजिकच विचार पुढे आला. आता बस सुरू करायची म्हणजे सोपं काम नाही. नवीन बस केळवे (माहीम) इथून सुरू करायची. (तेथे आमचे बरेच विद्यार्थी रहात होते) होती. नवनीतभाई हे समाजात चांगले काम करणारे असल्यामुळे त्यांना माहीत होतं की आम्हाला ठाण्यात परिवहन उपक्रमाच्या कार्यालयात जावे लागेल. अर्थात् मला हे नंतर समजलं. ते ठाण्याला जाऊन आले. आल्यानंतर मात्र मला ते सांगायला आले की आपल्याला बस मिळाली आणि ती तुमच्यामुळे मिळाली! मी म्हटलं, "हे कसं घडलं ?" ते म्हणाले, "आम्ही तिथे गेलो, तर तिथले प्रमुख अधिकारी होते फडणीस, म्हणून त्यांना आम्ही सांगितलं बसबद्दल . ते आधी म्हणाले की नवीन बस देणं आमच्या वेळापत्रकात बसत नाही. त्यामुळे याच्यासाठी वेळ लागेल. मग विषय निघाला की कॉलजचे प्राचार्य कोण. तर आम्ही सांगितलं तुमचं नाव. तेव्हा ते एकदम म्हणाले, तुम्हाला बस दिली आम्ही, असं समजा. आम्हाला काही कळेना. काही क्षणांपूर्वी ते म्हणाले होते ही व्यवस्था व्हायला वेळ लागेल, लिखापढी थोडी आवश्यक असते अशा कामासाठी आणि एकदम ते आता म्हणतात बस दिली म्हणून ! ते म्हणाले आधी मी म्हणालो ते ही खरं आहे. असं आहे, की पराडकरांच जर नाव असेल तर आम्हाला करायला पाहिजे. मी त्यांचा वर्गमित्र होतो. त्यामुळे त्यांनी सांगण्याची वाट बघण्याचं मला कारण नाही.

त्यावेळी मला पालघरला जागा नव्हती. त्यामुळे मी सकाळी ८ला जाऊन रात्री ८ला परत येत असे. त्यामुळे नंतर त्यांनी सुटीचा दिवस बघून मला फोन केला. मला म्हणाले, "तुम्ही मला आता एकदम ओळखणार नाही, पण मी तुमच्या वर्गात होतो. आणि माझी बायकोही तुमची वर्गमैत्रीणच आहे. तेव्हा आता आपलं हे घरातलं नातं आहे आणि घरातल्या नात्याला औपचारिक विनंतीची

आवश्यकता नसते आणि तशी औपचारिक विनंतीही संस्थेने केलीच आहे. तेव्हा तुम्हाला बस दिली असे समजा.''

अशा बऱ्याच गोष्टी आहेत. सगळ्याच गोष्टी सांगण्याचं प्रयोजन नाही. पण त्यामुळे काय झालं, की समाजातलं माझं स्थान मंडळींना कळलं. आणि साहजिकच माझ्याबद्दल चांगला ग्रह व्हायला अशा गोष्टींची सुरुवातीला मदत झाली.

नेहमीप्रमाणे जे मुंबईच्या महाविद्यालयात झालं तेच इथेही झालं. सुरुवातीपासून मला विद्यार्थ्यांचं प्रेम मिळालं. मी एक नियम केला होता की हा जंगलपट्टीचा भाग आहे. मच्छिमारांचा भाग आहे. ज्या गावात दळवळणाची साधनंसुद्धा उपलब्ध नाहीत त्या गावातून आमच्याकडे मुलं येतात, तेव्हा इंग्रजी भाषेचा शक्यतो आश्रय घ्यायचा नाही. मुलांशी होणारा सगळा व्यवहार हा मराठीतूनच होईल. त्यामुळे विद्यापीठातला सगळा पत्रव्यवहार सोडून बाकी सगळा माझा व्यवहार मराठीतून होत असे. सुरुवातीचं वर्ष असल्यामुळे प्राचार्य, हेडक्लार्क, टायपिस्ट, क्लार्क आणि प्यून हे सगळे बसायचे एकाच खोलीत. अजून निराळ्या खोल्या व्हायच्या होत्या. त्याचा एक फायदा असा मला झाला की प्रशासनातल्या या सर्वांशी माझी आपोआप जवळीक निर्माण झाली. त्यामुळे एकंदर वातावरणामधेही आत्मीयता होती. सुरुवातील विद्यार्थ्यांच्या संस्थेबद्दल आमचे अध्यक्ष भोगीलाल शहा फार चिंतीत होते. कारण संपूर्ण कॉलेजला (पहिल्या वर्षापासून बी.ए. पर्यंत) १९८ विद्यार्थी होते. त्यामुळे आमच्या महाविद्यालयात प्रवेशासाठी अमुक एक गुण पाहिजेत, अशी अट घालणं आम्हाला शक्य नव्हत. माझ्या दृष्टीने ते इष्टही नव्हतं. कारण शिक्षणाचे दरवाजे आतापर्यंत ज्यांना शिक्षण मिळालं नाही, त्यांना उघडून द्यायचे असतील तर त्यांच्या प्रवेशावर अटी घालणं मला योग्य वाटलं नव्हतं. कुठल्याही कॉलेजात प्राध्यापकांची काही किमान संख्या असतेच, त्यामुळे मंडळींना विद्यार्थ्यांची संख्या वाढवी असे वाटणे साहजिक होते. सगळे प्राध्यापक मीच निवडले होते. मराठीला प्राध्यापक पाटील म्हणून चांगले अनुभवी शिक्षक आम्हाला मिळाले. ते गिरगावात राहणारे होते. त्यामुळे त्यांनाही माझ्याप्रमाणेच सकाळी लवकर जाऊन रात्री उशीरा येण्याचा दिनक्रम स्विकारावा लागला होता. पण विद्यार्थ्यांची सहानभूती लाभल्यामुळे आमच कॉलेज तसं चांगल चाललं होत. आर्टस्‌प्रमाणे आमच्याकडे पहिल्यापासून कॉमर्सही होत. ही गोष्ट १९७०ची. पुढे मी त्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांना आकर्षण वाटावं म्हणून माझ्या मुंबईमधल्या समाजातल्या स्थानाचा उपयोग करुन घेऊन चांगल्याचांगल्या लोकांना मी बोलवत असे. आम्ही वै. दांडेकरांच्या स्मृतीनिमित्ताने वार्षिकोत्सव भरवत असू. मी स्वतः दांडेकरांच्या हाताखाली रुईयामधे शिकलेलो असल्यामुळे मला त्यांच्याबद्दल ज्यांना आस्था आहे अशा पुष्कळ लोकांची माहिती होती. त्यामुळे कीर्तनाची आणि अध्यात्माची जाणीव असलेल्या परिसरातल्या अशा पुष्कळ लोकांना मी तिथे 'दांडेकर-दिना' निमित्त बोलवू शकलो. आमच्याच एस्. पी. मंडळीचे अतिशय लोकप्रिय असे प्राध्यापक हुल्याळकर (तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान) यांनाही आम्ही एकदा बोलावल्याचे स्मरते.

आमचे त्यावेळचे पालकमंत्री भाऊसाहेब वर्तक. ते मला वीसेक वर्षांपासून हिन्दीचा प्रचारक म्हणून ओळखत होते. त्यामुळे १९७० ते १९७४ च्या या काळामधे महाराष्ट्रातल्या शिक्षणक्षेत्रातल्या अनेक नामवंत व्यक्तींना मी बोलवत आलो. पालघरमधे काही विशिष्ट कुटुंब अशी होती की त्यांना मी सोनोपंतांचा विद्यार्थी असल्यामुळे त्या दांडेकर मंडळींना माझ्याबद्दल आपोआपच थोडं प्रेम वाटत असे. काही कुटुंबाचे तर माझे त्यावेळेस जे संबंध निर्माण झाले ते अजूनही कायम आहेत.

एकदा तत्कालीन शिक्षणमंत्री श्री. नामजोशी यांना नवनीतभाईंनी अशाच एका कार्यक्रमासाठी बोलावले.

आंदोलनातून भाग घेतल्यामुळे आणि रेल्वे मंडळाचा सदस्य असल्यामुळे नवनीतभाईंची बऱ्याच ठिकाणी ओळख होती आणि ते अशी बोलावणी करायला जात असल्यामुळे मला काही ते काम करावे लागत नसे. (नामजोशी यांची आणि माझी ओळख असली तरी माझा स्वभाव 'माझी त्यांची ओळख आहे' हे सांगण्याचा नाही) तर तेव्हा त्या समारंभाला पालकमंत्री आले होते. त्यांनी आमचे स्वागत करताना असे उद्‌गार काढले की आम्ही मुद्दाम आमच्या या भागातल्या अशिक्षित समाजाला उच्च शिक्षणाची संधी मिळावी म्हणून हे महाविद्यालय सुरू केलं. तेव्हा महाविद्यालयाच्या प्राचार्यांना आमची अशी सूचना आहे की त्यांनी आता इथं अशा पद्धतीन शिकवावं की आपण खेड्यातले आहोत आणि महाविद्यालय जरी तत्वतः पुणे विद्यापीठाशी संलग्न असलं तरी संबंध सगळा पालघरचा किंवा ठाणे जिल्ह्याचा व्यवहार आणि शिक्षण ह्या दोन्ही दृष्टींनी - मुंबईशी आहे. तेव्हा इथल्या विद्यार्थ्यांना 'आम्ही मुंबईतल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपेक्षा कमी आहोत' असं वाटू नये आणि मनामधला न्यूनगंड नाहीसा व्हावा अशा पद्धतीने इथं शिकवावं अशी सूचना आहे. नंतर आमच्या महाविद्यालयाच्या कार्यकारी मंडळावरचे अप्पासाहेब दांडेकर बोलले (गो. र. दांडेकर) हे माझे व्यक्तिगत मित्र (दुर्दैवाने ते आज हयात नाहीत.) शिक्षणमंत्र्यांनी उत्तर देताना असं सांगितल की आमचे पालकमंत्री जे म्हणाले त्याच्या संदर्भात मी त्यांना असं विचारतो, की तुम्ही आमचे चांगले लोक इकडे आणता आणि वर सांगता की इकडल्या विद्यार्थ्यांना न्यूनगंड राहणार नाही असं शिकवा. मी उलट त्यांना असं सांगतो की, आम्हाला आता इकडची काळजी नाही, आम्हाला आता खरी काळजी मुंबईच्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या स्तराबद्दल निर्माण झाली आहे !

व्यासपीठावरून खाली उतरता उतरता नामजोशी दांडेकरांना म्हणाले, पराडकर जरी काही स्वतःच्या समर्थनार्थ काही बोलले नाहीत तरी आम्हाला त्यांच्याबद्दल काही चांगलं बोलणं प्राप्तच आहे ! कारण आमचा त्यांचा परिचयही जुनाच आहे.

अशा काही प्रसंगांमुळे मला तिथे पहिल्या चार वर्षांमधे विद्यार्थ्यांचेच नव्हे मंडळींचेही सहकार्य चांगलं मिळालं. एकदा त्यांनी शंकराचार्यांना बोलावलं होतं. शंकराचार्यांनी संस्कृतमधे भाषण केलं. पण मुलांनी इतकं शांतपणे ते ऐकून घेतलं की शंकराचार्यही म्हणाले की अहो, तुम्ही मुलांना फार चांगली शिस्त लावलेली दिसते!

त्याच काळात मी मुंबईच्या आकाशवाणीवर पावणेआठ ते सव्वाआठ पाठ देत होतो. आणि कबूल केलं पाहिजे की ते पाठ फार लोकप्रिय होते ! पहिल्या बारा-तेरा पाठां नंतर एकाच माणसाला किती पाठ द्यावे, असा सरकारी खात्यात स्वाभाविकपणे येणारा विचार पुढे आला. त्यांच्या मंडळांनी त्यांना सांगितल की आता हे पाठ असे झालेले आहेत की दुसऱ्या एखाद्या व्यक्तीला याचं सूत्र पकडून पुढे सांगणं हे फार कठीण आहे. पराडकरांनी सुरुवातच अशी केली आहे की एकंदर संस्कृत वाङ्मयाबद्दल आपुलकी निर्माण व्हायला पाहिजे ! खरं सांगायचं म्हणजे मी माझ्या काही अमेरिकेत स्थायिक झालेल्या कुटुंबीयांची नावे घेऊनच पाठ शिकवत होतो. माझ्या दृष्टीने त्यांत काही नवं नव्हतं. पण माझे विद्यार्थी - जे पाठात सामील होत असत - एक डॉक्टर होता, त्याची बायको रसायनशास्त्रातील डॉक्टर होती. त्यामुळे ते जे मला प्रश्न विचारायचे ते शाळेतल्या संस्कृत समासांचे नव्हते किंवा 'रूपं ओळखा' अशा स्वरूपाचे नव्हते. ते प्रश्न असा विचारत, की सध्या निवडणुका चालू आहेत, तर निवडणुकांमधे कुणाला आपण निवडावं? मग मी सांगत असे की बाबा रे, कुणाला निवडावं हे थेट मला सांगता येणार नाही पण कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रामधे मंत्री कसे निवडावेत, या संबंधाने राजाला उपदेश केलेला आहे. तो असा आहे की मंत्री हा तुमच्याबरोबर शिकलेला

असावा का? जर तुमच्याबरोबर शिकलेला असेल तर त्याचे फायदे काय? त्याची दडपणं काय येतात? मी दडपणं नाहीशी कशी करावीत? असं सांगताना मी कौटिल्याची वचने उद्धृतही करीत असे.

आमच्या विद्यार्थ्याने एकदा असा प्रश्न विचारला की, आम्ही डॉक्टर स्टेथास्कोप लावतो. पूर्वी काय पद्धत होती हो? मी उत्तर दिले की पूर्वी आमच्याकडे नाडीपरीक्षा करीत असत. "या नाडीपरीक्षेसंबंधाने तुम्हाला संस्कृतमधे सांगता येईल का?" या प्रश्नावर मी म्हणत असे की, अहो, अनेक पुस्तकं आहेत. मी पुस्तकांची नाव आणि नाडी याची व्युत्पत्तीही सांगितली.

त्यावेळेस रत्नागिरी हे केन्द्र नुकतचं झालं होत. औरंगाबाद, मुंबई, नागपूर आणि पुणे अशी चार केन्द्रे त्यावेळेस. त्यांनीच ठरवलं आणि मला सांगितलं की आम्ही सर्वानुमते असं ठरवलं आहे की तुम्हाला वर्षभर हे काम द्यायचं. १३ पाठ प्रत्येकाला (प्रत्येक केन्द्राला) अशी व्यवस्था आम्ही करू. पण तुम्ही हे काम स्वीकारा. कारण वाङमय मुखानं व्याकरण सांगणं किंवा वाङ्मय-मुखानं पाणिनीची सूत्रं सांगणं. किंवा प्रथम शाकुंतलाची गोष्ट सांगून 'शाकुंतल' ची वैशिष्ट्य सांगणं. हे सगळं. इतरांना जमणं कठीण आहे. कारंडे म्हणून जे तिथले पदाधिकारी होते ते तर म्हणाले, "पराडकर, हा तर संस्कृतीचा आरसा आहे. तुमच्या पद्धतीन हे सारं उपलब्ध करून देणं फार कठीण आहे आणि प्रश्नोत्तरांची तुम्ही अवलंबलेली रीत तर फारच बहारीची आहे !" त्या बाबतीत माझ्या सौभाग्यवतीने सुद्धा सांगितलं, 'तुमच्या पाठाला तोडच नाही. बी.टी. माणसालाही तुमच्या पाठात काही उणं काढता येणार नाही. मी बी.टी. असते तरी मला लिहिता येणार नाही.

हे सारं पालघराच्या आठवणी सांगत असताना सांगण्याचं कारण आहे. पालघराच्या प्रवासात मला दोन-अडीच तास मिळत असत. त्या वेळात मी हे पाठ लिहीत असे ! म्हणजे त्यातही असं होतं की मला एक महिनाभर आधी सगळ्यांकडे टंकलिखित प्रती पोहोचल्या पाहिजेत म्हणून मला जूनमधले पाठ असतील तर ते चारही पाठ मला मे मध्ये द्यावे लागत असत. माझ्या कॉलेजमधलं स्थान अधिक निश्चित करण्यातसुद्धा याची अप्रत्यक्ष मदत झाली. कारण पुष्कळांच्या घरात रेडिओ असे. यातही एक सांगायची गोष्ट म्हणजे मी सरकारला कळवले होते की, तुम्ही हे पाठ शनिवारी सकाळी पावणेआठला सादर करता आणि या दिवशी या वेळी विद्यार्थी शाळेत असतात, घरी नसतात. तेव्हा वार बदललात तर ज्या विद्यार्थ्यांसाठी मी हे करतो. त्यांना ऐकता येईल. पण ते आजतागायत झालेलं नाही. ठीक आहे ! पण मला त्याचा जो लाभ व्हायचा तो झालेला आहे. मुंबईप्रमाणे महाराष्ट्राच्या इतर प्रांतात मुलांचे पालक आमचा पाठ ऐकत होते. याचाही परिणाम असा होई की, वर्गात शिस्त निर्माण करण्यासाठी मला प्रयत्न करावे लागत नसत.

महाविद्यालयात निवडणुका या असतातच. त्या चार वर्षात तिथे असा एकदा प्रसंग आलाकी, मी विद्यार्थ्यांना सांगितले की, मीच एक कार्यक्रम असा योजतो की, ज्यामध्ये उमेदवाराने 'मला का निवडून द्यावं' हे सांगावं. काही मुलं म्हणाली, एवढ्या लोकांसमोर आम्ही हे सांगायचं कसं? मी म्हटलं, कसं सांगायचं हे तुम्हाला मी सांगतो. काय सांगायचं हे तुम्ही मला आधी सांगा ! माझा एक दंडक मात्र आहे की, दुसरा जो निवडणुकीला उभा राहिलाय त्याला काही कळत नाही, ही भाषा तुमच्या तोंडी येता कामा नये. कारण सगळेच माझे ! पण तुमचा पूर्वानुभव काय? शाळेत असताना विद्यार्थ्यांची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला आहे का? की नुसतंच शिक्षण एके शिक्षण केलंय? अमुक एका खेळात कलाप्रकारात मला बक्षिसं मिळाली होती अशा प्रकारचं तुम्ही सांगू शकता ! तुम्ही मर्यादेचा अतिक्रम केलात तर मी आहेच ! त्यामुळे निवडणुकांच्याबाबतीतसुद्धा मला माझ्या विद्यार्थ्यांचा अनुभव चांगलाच आहे ! त्यावेळचे विद्यार्थी

आजही भेटले तर फार आपुलकीने बोलतात !

नंतर आम्ही आमच्या काही सहकाऱ्यांच्या मदतीने तिथे एक लहानसं होस्टेल सुरू केलं; कारण विद्यार्थ्यांना साडेसातला यायचे म्हणजे पहाटे लवकर घर सोडावं लागे आणि साडेबाराला कॉलेज सुटल्यावर घरी पोहोचायला अडीच वाजत. त्या हॉस्टेलचे सुपरिटेंडेंट म्हणून आमच्या श्री. पाटील यांना नेमलं. मग तिथे थोड्या मूल्यामध्ये पाव आणि भाजी देता आली तर द्यावी, मंडळाला सांगून तोही प्रयत्न केला.

असे अनेक प्रयत्न त्या चार वर्षात केल्यामुळे मला विद्यार्थ्यांची सहानुभूती मिळाली, पण याचाच एक परिणाम असा झाला की, महाविद्यालयाच्या विद्यापीठीय वर्तुळामध्ये आणि एकंदर तिथल्या समाजामध्ये 'सोनोपंत दांडेकर मंडळींचं कॉलेज' असं रूढ होण्याऐवजी 'पराडकरांचं कॉलेज' असं रूढ झालं. याला वस्तुत: माझा काही इलाज नव्हता. मला असं वाटतं की अप्रत्यक्षपणे आमचे अध्यक्ष भोगीलाल शहा आणि आमचे कार्यकारिणीचे सर्वात महत्वाचे सदस्य नवनीतभाई यांना मनातून वैषम्य निर्माण झालं.

मी खेळांनासुद्धा माणसाच्या व्यक्तिमत्वविकासामध्ये स्थान आहे असं मानी. असल्यामुळे वार्षिक क्रीडादिनाला मी एक वर्ष खंडू रांगणेकरांना बोलावून आणलं. कारण खंडू रांगणेकरांची बायको ही माझी वर्गमैत्रिण आणि एकंदर सर्वच खेळांमध्ये मला थोडीशी गती असल्यामुळे ज्या वेळेस परिचय करून द्यायचा होता. त्यावेळेला आमच्या विद्यार्थ्यांच्या मंडळाचे अध्यक्ष ते स्वत: क्रिकेट खेळलेले होते. त्यांनी सांगितलं, 'सर, तुम्ही असताना मी त्यांचा परिचय करून देणं, हे जमणार नाही. तुम्हीच त्यांचा परिचय करून द्या कारण तुम्हाला क्रिकेटची एवढी माहिती आहे.' मी म्हटलं, 'मी पुस्तक आणून ठेवलंय, तुम्ही वाचून बोला' पण ते त्यांनी मानले नाही. योगायोग असा की मी वाचतो, त्यामुळे मला माहिती होती ! एका वर्षी मी माधव मंत्रींनाही बोलावलं होतं !

पण या सगळ्याचा परिणाम सुप्तपणानं असा होत गेला की, पराडकराना महत्त्व दिलं गेलं - त्यांच्या मते. पण जे महत्त्व या मंडळींच्या लोकांना मिळायला पाहिजे होतं ते त्या प्रमाणात मिळालं नाही. योग्य तो त्यांचा सन्मान मी वेळोवेळी करत होतो. पण एकदा ही मंडळी आलेली असताना मी बॅडमिंटन खेळतोय असं त्यांच्या लक्षात आलं आणि आमच्या त्या वेळच्या कार्यवाहांना हे खेळ फारसे पसंत नव्हते. त्यामुळे ते म्हणाले, 'तुम्ही असे कॉलेज चालू असताना खेळत असता?' मी म्हटलं, 'क्रीडा-खोलीतच मी मुलांबरोबर खेळत आहे. मुलांवर एकीकडे लक्ष ठेवतो आहे. यात गैर ते काय?' सुदैवाने आमची जागा मात्र बरीच मोठी म्हणजे १३ एकरांची होती. त्यामुळे विद्यार्थ्यांना खेळायला आम्ही बराच वाव देऊ शकलो. आम्ही कबड्डीच्या आंतर-महाविद्यालयीन स्पर्धांनासुद्धा आमच्या मुलांना पाठवू शकलो. एक मात्र होतं की मुला-मुलींचा माझ्यावर विश्वास होता. त्यामुळे कब्बडीच्या एका विद्यार्थिनीला (केळव्याच्या) बरं नव्हतं म्हणून सभेला ती आली नाही; तर मी आमची गाडी काढून केळव्याला गेलो होतो आणि तिच्या आई-वडिलांना सांगून आलो की, तुम्ही तुमच्या मुलीला महाविद्यालयातर्फे पाठवणार नाही?' ते म्हणाले, 'कोण म्हणतं? तुम्ही आल्यावरही पाठवलं नाही तर फारच करंटे ठरू आम्ही !' त्यांची-माझी आधी ओळख होती असं नाही, पण माहिती असते. अशामुळे होतं काय की, सर्व विद्यार्थ्यांशी माझे व्यक्तिगत संबंध अजून शिल्लक आहेत. काही आमच्या कुटुंबाचे सदस्य झालेले आहेत. शैला नावाच्या वाणिज्य शाखेतल्या मुलीचं तर आम्ही दोघांनी पालकत्व पत्करलं होतं !

तेव्हा एकंदर सर्व जरी उत्तम चाललेलं असलं तरी हळूहळू माझ्या मनाविरुद्ध प्राध्यापकांमध्ये काही गट निर्माण होत होते. व्यक्तिश: माझ्याबद्दल कोणी विशेष बोलत नसे, कारण बोलण्याला तसा वाव मी कमी देतो ! चांगलं

बोलण्यापेक्षा चांगलं करण्यावर माझा विश्वास अधिक आहे. चांगलं बोलणं हे असावंच; कारण मनु म्हणतो, 'सत्यं ब्रूयात् । प्रियं ब्रूयात् । न ब्रूयात् सत्यम् अप्रियम् ॥' इथे अप्रियम् हे क्रियाविशेषण आहे. त्यामुळे चांगल्या पद्धतीनं सत्य हे अप्रिय असलं तरी सांगावं. वाईट पद्धतीनं सांगू नये. मी अशा पद्धतीने सांगत असे. पण तरी ते अप्रिय होतंच. पुष्कळ गोष्टी अशा अप्रिय असतात की, ज्या प्राचार्यांना सांगाव्या लागतात. तेव्हा मी ते माझं कर्तव्य म्हणून करीत होतो.

याच काळात एक महत्त्वाची घटना अशी घडली की आमच्या संस्थेनं एक असा कार्यक्रम आखला की, ज्याच्या जोरावर एकंदर संस्थेला देणगी मिळावी. तो अतिशय महत्वाचा कार्यक्रम होता. आता माझंच दुर्दैव म्हटलं पाहिजे की, तो कार्यक्रम ज्या दिवशी होता (मुंबईत) त्या दिवशी मला नागपूरच्या विश्व हिन्दी सम्मेलनाला एका विषयाचा समारोप करण्यासाठी बोलावण्याचं ठरलं होतं. अर्थात् ही गोष्ट काही एकदम ठरत नाही. काही महिने अगोदरचा तो पत्रव्यवहार असतो. त्यावेळचे नागपूरचे शेवडे हे हिन्दीमुळे माझे मित्र. त्यांनी सुरुवातीपासूनच असा आग्रह पत्रातून धरला होता की, हे पहिलं विश्व हिन्दी सम्मेलन आहे तरतुम्ही एका सत्राच्या समारोपाला यावं, अशी माझी इच्छा आहे. मी आमच्या मंडळीच्या अध्यक्षांना सुरुवातीपासून जाणीव दिली होती. पण हळूहळू प्रतिकूल वातावरण होत होतं. त्यांचं पत्र तीन महिने पूर्वी आलं होतं आणि मी लगेच अध्यक्षांना लेखी पत्र लिहिलं होतं की अशी अशी परिस्थिती आहे, भारतामधून या संमेलनाला हजर होणारे जे प्रतिनिधी आहेत, त्यातल्या मुंबईच्या फक्त मलाच त्यांनी विशेष अतिथी म्हणून बोलावलं आहे, तर त्याला तुम्ही संमती द्यावी. तोपर्यंत आमच्या कॉलेजमधल्या असंतुष्ट गटाचे म्होरक्ये (नावामध्ये मला रस नाही) त्यांनी असं भासवण्याचा प्रयत्न केला की हे कॉलेजचं काम न करता इतर कामं फार करतात. त्यांच्या दुर्दैवाने कॉलेजच्या परीक्षांचे निकाल मात्र ८०% च्या पुढे होते ! पण त्यांनी असं सांगायला सुरुवात केली की, पराडकर इतर व्याप सांभाळून जेव्हा जमेल तेव्हा कॉलेजकडे लक्ष देतात. कॉलेजचं प्रशासन करणारा जो कर्मचाऱ्यांचा वर्ग आहे, तो माझ्या बाजूचा होता. कारण ते सगळं प्रत्यक्ष पहात होते.

'केन्द्रीय हिन्दी निर्देशालय' म्हणून दिल्लीत एक संस्था आहे. त्या संस्थेने मला राजस्थानमधल्या विद्यापीठांमध्ये हिन्दीला काय स्थान आहे म्हणून एक अहिंदीभाषी हिंदी विद्वान म्हणून सर्व राजस्थानच्या विश्वविद्यालयांना भेट देण्यासाठी निवड केली. ते मी त्यांना सांगितलं. हे माझ्या तिथल्या पहिल्या दोन-तीन वर्षांमधलंअसल्यामुळं एकंदर माझ्याबद्दल आस्था होती. त्यामुळे त्यांनी त्यावेळेस 'हो' म्हटलं. पण प्रत्यक्ष जाण्याचा काळ हा कॉलेजच्या सुटीचा होता. अर्थात् प्राचार्यांना त्यावेळेस सुटी नसेच. माझ्या हेडक्लार्कनी मला 'खुशाल जा' असं सांगितलं होतं आणि पंधरा-वीस दिवस सगळं काम सांभाळण्याची तयारीही दाखवली होती. तेव्हा गेल्यामुळे मंडळीच्या दृष्टीनं माझ्या अप्रियतेत अधिक भर पडली. ही अप्रियता वाढवण्याचं काम माझे काही सहकारी कौशल्याने करीत होते. त्यानंतर हा विश्व हिन्दी संमेलनाचा प्रसंग आला.

मी शेवटी शेवड्यांना स्पष्ट कळवलं होतं की एकंदर प्राचार्यांनी जावं, असं मंडळींना वाटत नसल्यामुळे मी काही येणार नाही. त्यांची तार आली की, आमचा हिरमोड होतो आहे. आम्ही तुमच्या मंडळींना लिहितो. त्यांनी मंडळींना लिहिलं - लिहिलं नव्हे तारा पाठवल्या की काही करून तुम्ही यांना तेवढ्यापुरती मोकळीक द्या !

त्याच काळात माझ्या सासूबाईंचं निधन झाल्यामुळे मी पुण्याला गेलो होतो. मी संमेलनाचं विसरुनही गेलो होतो. कारण प्राचार्य जरी झाला तरी मंडळींचा तो सेवकच. त्यांनी मला सांगितलं की तुम्ही हा विषय कार्यकारिणीसमोर मांडा, मग आम्ही परवानगी देऊ. मी म्हटलं, मी तत्वत: हा विषय तिथे मांडणार नाही कारण कार्यकारिणीसमोर

मांडल्यानंतर काही लोकांचं मत माझ्या बाजूने, काही लोकांचं विरुद्ध. असे मतभेद कशाला? मी अध्यक्षांना कळवलेलं आहे, त्यांनी आपल्या जबाबदारीनं निर्णय घ्यावा. तो निर्णय जर ते घेत नसतील तर मी जायला उत्सुक नाही. कारण माझे आणि विश्व हिन्दी संमेलनाच्या आयोजकांचे व्यक्तिगत संबंध आहेतच. फार तर काय होईल? त्याला उजाळा मिळाला असता, तो नाही मिळणार ! पण झालं काय की, मी पुण्यात असताना त्यांच्या ५-६ तारा आल्या. मी आल्यानंतर अध्यक्षांचा मला फोन. 'अहो त्यांच्यासारख्या तारा येत आहेत.' मी म्हटलं, 'मग मी आता काय करू?' अध्यक्ष म्हणाले, 'आम्हाला ते वाईट दिसतं.' मी म्हटलं, 'दिसतं काय, चांगलं की वाईट हे तुम्ही बघायचं. हे बघायचा अधिकार सेवकांचा नसतो. तेव्हा तो मला नाही. आता निर्णय तुम्ही घ्यायचा.'

मध्यंतरी आमच्या हिन्दी विद्यापीठानं मंडळीला लिहिलं होतं की हा शैक्षणिक समारंभ आहे आणि यामध्ये तुमच्या महाविद्यालयाची प्रतिष्ठा वाढणार आहे. पण बम्बई हिन्दी विद्यापीठ माझंच ! त्यामुळे याचा परिणाम 'चोर चोर मौसेरे भाई' असा झाला. मी तरी सांगितलं होतं, हिन्दी विद्यापीठाला की, तुम्ही लिहून उपयोग होणार नाही. पण ते मला म्हणतात की, आम्ही लिहिणार, आमच्या मनाचं समाधान. आम्ही लिहितो, एवढंच नव्हे तर आम्ही तुमचं नागपूरचं तिकीट आरक्षित करून ठेवतो. मी म्हटलं, 'अहो, फुकट जाण्याचा संभव अधिक आहे.' ते म्हणाले, 'जाऊ द्या. पण असं होऊ नये की, एकदम त्यांना उपरती झाली आणि मग तुम्ही तिकिट नाही म्हणून जाऊ शकत नाही !' मुंबई हिन्दी विद्यापीठ एकंदरित माझ्या बाबतीत नको तितकं पक्षपाती आहे !

श्री. शेवड्यांनी पाठवलेल्या तारांमुळे कॉलेज-परिसरात चर्चा सुरू झालीच होती. त्यामुळे मंडळीची थोडी पंचाईतच झाली होती आणि एकेदिवशी शुभ संध्याकाळी संमेलनाच्या आधी दोन दिवस मला अध्यक्षांचा फोन आला. म्हणाले, 'तुमची काय इच्छा आहे?' मी म्हटलं, 'माझी नवी इच्छा काहीही नाही ! आता माझ्या इच्छेचा प्रश्न नसून तुमच्या इच्छेचा आहे ! तेव्हा तुम्ही काय ते करा. मी तो विषय सोडून दिलाय !' अध्यक्ष म्हणाले, 'तुम्ही जाऊ शकता.' त्यांना खात्री होती की यांना आता तिकिट मिळणार कसं? पण त्याबाबतीत पुन्हा त्यांचं दुर्दैव आड आलं. कारण आधी सांगितल्याप्रमाणे माझं तिकीट आधीच काढलं गेलेलं होतं. रात्री मी माझे मित्र सुर्वे यांना फोन लावला. त्यांना परिस्थिती सांगितली आणि त्यांचा सल्ला मागितला. सुर्वे यांनी मला पडत्या फळाची आज्ञा म्हणून जायला सांगितलं.

माझ्या दुर्दैवाने ती गाडी २४ तास लेट झाली. त्यामुळं तिथे मला ज्या पद्धतीनं ते करायला पाहिजे होतं, त्या पद्धतीनं ते होऊ शकलं नाही. तरी मी समारोप केला. पण माझं मात्र पूर्ण समाधान झालं नव्हतं. हा माझ्या योगाचा भाग !

पण इकडे संस्थेच्या मदतीच्या कार्यक्रमाला मी अनुपस्थित. तत्पूर्वी मी माझ्या सहकाऱ्यांना म्हटलं होतं की एका दिवसाचा पगार आपण या निमित्ताने संस्थेला देऊया. सगळ्यात जास्त निधी आमच्या कॉलेजच्या प्राध्यापकांनी दिलेलाच ठरला. (आमचे तत्कालीन उपप्राचार्य मला तेव्हा म्हणाले होते की, तुम्ही नागपूरला जाऊ नका. म्हणनू मी सुर्व्यांचा सल्ला घेतला होता. सुर्वे म्हणाले, तुम्ही कॉलेजसाठी जे करायचे, ते अगोदरच केले आहे. आता प्रत्यक्ष उपस्थित राहायला उपप्राचार्य समर्थ आहेत.)

कार्यकारिणीच्या पुढच्या सभेत बोलताना मी सांगितलं की, आपण जो निधी एवढा जमवून दिला आणि लोकांचं पाठबळ मिळालं त्यामुळे ही केवळ आपल्या कॉलेजच्या उत्कर्षाची नांदी आहे आणि आपण जर आपल्या कॉलेजमध्ये गट निर्माण होऊ दिले नाहीत तर आपली प्रगती निश्चित आहे. गट झाले होते याची मला

जाणीव झालेली होती.

ही ७४ सालची गोष्ट आहे. मला अध्यक्षांचं लिखित पत्र आलं की तुम्ही आम्हा साऱ्यांचा अपमान केलेला आहे. त्या सभेत असं बोलून. त्यामुळे स्पष्टीकरणाचं तुमचं पत्र अमुक मुदतीत आलं नाही तर आम्हाला निराळा विचार करावा लागेल ! मी काय वावगं बोललो ते मला आणि जाणत्यांना अजून कळलेलं नाही !

मी त्या पत्राचं उत्तर लिहिताना असं म्हटलं की अशा अविश्वासाच्या वातावरणात माझ्यासारख्या माणसाला काम करणं कठीण आहे. पुढे असंही लिहिलं की मी असं असं तिथे बोललो आणि यात काय तुम्हाला अपमानास्पद वाटलं हे मला आजपर्यंत समजलेलं नाही. पण तुम्ही जर असं समजत असाल तर याच पत्राबरोबर तीन महिन्यांची मी नोटीस दिलेली आहे, असं समजा आणि हाच माझा राजीनामा समजा.

तत्पूर्वीच्या काळात आधी सांगितल्याप्रमाणे फार मोठमोठे लोक आमच्या महाविद्यालयात येऊन गेले होते. या सगळ्या घटनेपूर्वी आणखी एक घटना घडली, त्याचाही त्यांना त्रास झाला असावा, असं मला वाटतं. अर्थात् माझं हे अनुमानच आहे. न.र.फाटकांना मी बोलावलं होतं. ते म्हणाले, 'तुम्ही मला आणण्या-नेण्याची व्यवस्था केलीत तर १ ऑगस्टला टिळकांवर बोलेन.' पहिल्याप्रथम अध्यक्षांकडे चहापान. आमच्या अध्यक्षांनी फाटकांना सांगितलं, 'मग आता समारंभ संपल्यावर आमच्याकडेच जेवायला या.' फाटक म्हणजे टोकाचे स्पष्टवक्ते. ते म्हणाले, 'हे बघा, मी तुमच्यासाठी आलेलो नाही. मी पराडकरांसाठी हे स्वीकारलं. तेव्हा माझं जेवण त्यांच्याकडेच होईल. कारण मी तुम्हाला माहिती नसलं तर सांगतो - मी सौभाग्यवती पराडकरांना देवी म्हणतो. त्यामुळे माझा पाहुणचार त्यांनी करावा हे रास्तच आहे. तेव्हा हे होणार नाही.' आता यात मी काय करणार? आमच्या अध्यक्षांना आणि नवनीतभाईना ते फार लागलं असावं. अर्थात् फाटक हे सारं बोलले हे मला नंतर कळलं. कारण जेवणानंतरच्या गप्पांसाठी माझ्या बंगल्यावर काही निवडक प्राध्यापक रीतीप्रमाणे यायचे ते आले नाहीत ! वास्तविक बंगला मंडळीनेच मला राहायला दिलेला. या बंगल्याच्या बाबतीतलाही एक किस्सा सांगण्यासारखा आहे. आमच्या कॉलेजमधल्या शिक्षण शस्त्राच्या प्राध्यापकाने मंडळींना विनंती केली होती की तुम्ही आम्हाला यांच्या बंगल्यात जागा द्या. आता सर्वांनाच हे माहीत आहे अशा तऱ्हेने कुणी वागत नाही. मी मंडळींना लेखी कळवलं की जागा तुमचीच आहे. तेव्हा देणार असाल तर अडवणारा मी कोण? मला मात्र असं वाटतं की, हे शैक्षणिक नाही. माझ्याच बंगल्याच्या गच्चीवरची खोली प्राध्यापकांना देणं हे मला पसंत नाही. अप्रत्यक्षरीतीने हा पाळतीचाच प्रकार ! प्रत्यक्षात त्या प्राध्यापकांना त्या खोलीत राहणे वगैरे जमले नाही वगैरे सोडून द्या. पण हा प्रकार म्हणजे मला दिवसेंदिवस वातावरण प्रतिकूल होत होतं त्याचा एक पुरावा होता. असे अनंत पुरावे माझ्याकडे आहेत. मी सगळे इथे सांगत नाही कारण त्याची जरुरी नाही, तो आता इतिहास आहे.

या सगळ्याचा परिणाम म्हणजे अध्यक्षांचे ते पत्र नि माझे त्याला तसे उत्तर. माझ्या सुदैवानं वासुदेवराव म्हणजे सर्वांचे नाना करंदीकर म्हणून एक उत्तम जाणकार होते. डहाणूतले वकील हे आमच्या कार्यकारी मंडळावर होते. पत्र पोहोचल्यावर करंदीकर आमच्या घरी आले. मला म्हणाले, 'अहो, हे तुम्ही काय केलंत?' मी म्हटलं, 'मी आणखी वेगळं काय करावं, अशी अपेक्षा आहे?' मला ते म्हणाले, 'स्वाभिमानाच्या दृष्टीनं तुमचं सगळं बरोबरच आहे. पण मी एक अनुभवी वकील म्हणून तुम्हाला सल्ला देतो, असं पत्र ठेवून तुम्ही इथून जावं असं मला वाटत नाही. हे खरं आहे की, तुम्हाला इथं काम करणं कठीण आहे. पण आपण यातून काहीतरी मार्ग काढू. पण तो मार्ग काढण्यासाठी आपण आधी काय केलं पाहिजे? तुम्ही राजीनामा मागे घेतला पाहिजे. मी मंडळीला सांगतो की,

पराडकर जूनमध्ये सोडतील. हे जरा तुमच्या करिअरच्या दृष्टीनं चांगलं होईल. त्यांनी राजीनामा स्वीकारण्यापूर्वी तो परत घेण्याचा अधिकार तुम्हाला आहे. तुम्ही असा तो मागे घेऊन आमच्या संस्थेला एक संधी द्यावी.' आमचे-त्यांचे घरोब्याचे संबंध होते. म्हणून मग मी तो राजीनामा सात दिवसांच्या आतच मागे घेतला. 'जर वातावरणात अनुकूल बदल झाला, तरच मी प्राचार्य म्हणून काम करू शकेन.' असं मी मंडळींना सांगितलं. दुर्दैवाने हे नुकतेच दिवंगत झाल्यामुळे माझा मोठा आधार नाहीसा झाला. मी राजीनामा मागे घेतल्यानंतर दोन महिन्यांनी मला पत्र पाठवलं की तुम्ही आता प्राचार्य नाही, अशी आमची भूमिका आहे. हे पत्र त्यांनी मला एक प्यूनकरवी पाठवलं. तेसुद्धा उघडं ! आता 'प्रभारी प्राचार्य' झालेले मराठीचे शिक्षक पाटील हे उपप्राचार्य होते, ते अगदी खूश होते. मीच त्यांची नियुक्ती केली होती हे मागे आलेच आहे आणि 'मी तुमचा विद्यार्थीच समजतो स्वत:ला' अशा आशयाचं त्यांनी मला लिहिलेलं पत्रही माझ्याजवळ आहे ! आयुष्यात एकेक गमती असतात ! तरीसुद्धा माझा बंगला होताच. कारण तो सोडणे म्हणजे माझा हक्क सोडण्यासारखेच होते. आता हा अनिर्णित प्रश्न असल्यामुळे माझा पगार काढून ठेवायला हवा होता. पण हे सगळं संस्थेला करायचं नव्हतं. करंदीकर मला म्हणाले, 'अजून जूनला पुष्कळ वेळ आहे. आपण 'व्हाइस-चॅन्सलर ऑफ बॉम्बे युनिव्हर्सिटी' यांच्याकडे जाऊया.' तोपर्यंत आम्ही बॉम्बे युनिव्हर्सिटीला जोडले गेलेले होतो. त्यावेळी मुंबई विद्यापीठाचे उपकुलपती होते टोपे. पण तेवढ्या काळात ते दुसरीकडे गेल्यामुळे राम जोशी आले होते. वस्तुत: त्यांची माझी जुनी ओळख. परंतु त्यांचा निर्णय जूनमध्ये असा आला की मंडळींचं बरोबर आहे म्हणजे युनिव्हर्सिटीने हात झटकले ! संस्था ही नेहमी समर्थ असते असा अनुभव मला आला. या सगळ्या काळात जसे करंदीकर माझ्या बाजूने होते तसे सुर्वे हे माझे मित्रही माझ्याबरोबर होते. ते म्हणाले, 'मला जो लॉ कळतो, त्यावरून Withdrawn Resignation does not Exist. त्यावरून मागे घेतलेले राजीनामापत्र स्वीकारल्यामुळे त्यांची चूक झालेली आहे. ही चूक त्यांना महागात पडेल.' मग आम्ही युनिव्हर्सिटीतून मागे घेऊन ही केस ठाण्याच्या कोर्टात लावली. शं.नां. चे वडिलभाऊ गो.ना. नवरे हे माझे तेव्हाचे वकील. त्यांच्याकडे सुद्धा मला नेलं करंदीकरांनीच कोर्टाची पायरी चढू नये म्हणतात. पण मी चढलो होतो खरा ! नवऱ्यांना मी म्हटलं, 'तुम्ही माझी केस स्वीकारा याचं कारण माझा विजय निश्चित आहे. माझा विजय म्हणजे तुमचा विजय, कारण तुम्ही केस लढणार.' ही केस ६ वर्ष कोर्टात चालू होती. संस्थेने सुप्रसिद्ध वकील रमाकांत ओवळेकरांना वकीलपत्र दिले होते. (नंतर मला कळलंकी गो.नां.च्या बायकोला मी फर्स्ट इयरला शिकवलं होतं !) १९८० साली माझ्या बाजूने निकाल दिला गेला आणि असं सांगितलं की हे सारं malafide आणि illegal आहे. त्यामुळे ते महाविद्यालयामध्ये प्राचार्य आहेतच, असं धरून decree काढली, की हे पैसे संस्थेला भरावे लागतील. एका शिक्षकाच्याकरवी संस्थेचा फार मोठा पराभव झाला होता ! त्यामुळे त्यांनी ६ महिने गावात कळवलंच नव्हतं, पण कोंबडं झाकल्यामुळे उजाडायचं थोडंच रहाणार ! लोकांना कळलंच.

संस्थेने केस हायकोर्टात नेली. तारखा पडू लागल्या. चन्द्रशेखर धर्माधिकारी हायकोर्टाचे जज्ज. तेही मला हिन्दीचा, संस्कृतचा माणूस म्हणून मला ओळखत होते. शिवाय त्यांची बायको महाराष्ट्र राज्याचे मासिक निघत असे त्यांची संपादक होती. त्यात मी लिहिलं होतंच ! त्यांनी एकदा संस्थेला ऐकवलं की, 'तुम्ही प्राचार्यांना नोकर समजता, हे योग्य नाही. केस लावण्याच्या बाबतीत मी काही तुम्हाला अडवू शकत नाही. पण एक आहे की, ५०,००० रुपये आधी भरा. ते भरलेत तर तुम्हाला परवानगी मिळेल.' संस्थेला तेही करावे लागले. पण

(पान क्र. २१ वर)

# महाबळिपुरम येथील रथमंदिरे


*भारतातील प्रसिद्ध अशा कलाकृतींच्या परिचय मालिकेतील हा एक लेख - संपादक*

मामल्ल वंशाच्या अमदानीतील अत्यंत महत्वाच्या वास्तू चिंगलपुट जिल्ह्यातील मामल्लपुरम किंवा महाबळिपुरम या मद्रासच्या दक्षिणेस ५१ १/२ कि.मी. अंतरावरील ठिकाणी आहेत. ही कोरीव मंदिरे समुद्रकाठी आहेत. मोठमोठ्या खडकात कोरलेली ही मंदिरे सप्तरथ मंदिरे




(सेव्हन पॅगोडाज) या नावाने प्रसिद्ध आहेत. प्रसिद्ध पल्लव नरेश नरसिंह वर्मन याच्या प्रेरणेने ती तयार करण्यात आली. एकसंध दगडात कोरलेल्या या मंदिरांना 'रथ' हे नाव आहे. महाबलिपुरम शहराच्या अगदी दक्षिण टोकाला असलेल्या पाच रथमंदिरांच्या समूहाला विशेष महत्त्व आहे. एका लहानशा रुंद टेकडीवजा खडकात ती कोरली आहेत. ती गुहामंदिरांप्रमाणे फक्त आतूनच कोरलेली नाहीत तर वेरूळच्या कैलास लेण्याप्रमाणे ती आतून व बाहेरून बांधलेल्या देवालयासारखीच दिसतात. द्रौपदी, अर्जुन, भीम व धर्मराज या नावाचे चार रथ एका ओळीत आहेत. त्यांच्या पुढील बाजूस सहदेव रथ आहे. द्रौपदी रथ सर्वात साधे खेड्यातील झोपडीच्या आकाराचे मंदिर आहे. सहदेव रथाचा वरील भाग हत्तीच्या पाठीसारखा गोलाकार आहे. नंतरच्या दक्षिण भारतीय मंदिर बांधणीच्या विकासात धर्मराजरथ व अर्जुनरथ यांचा विशेष प्रभाव पडलेला दिसून येतो तर भीम रथ व गणेश रथ यांच्या रचनेचा परिणाम नंतरच्या गोपुरांच्या विकासात आढळून येतो.

धर्मराजरथ - याचा तळमजला चौरस आकाराचा असून त्याच्या पश्चिमेला एक उघडा सोपा. या मजल्यावर तीन मजल्यांचे सूचीच्या आकाराचे शिखर आहे. दोन मजल्यांच्या मधे बहिर्गोल कंगण्या आहेत. प्रत्येक कंगणीवर अश्वनालाकृती कोनाडे व त्यात मानवी शीर्षे अशी सजावट आहे. या कोनाड्यांना तामीळ भाषेत 'कुडू' म्हणतात. चैत्यगृहांवरील मोठ्या अश्वनालाकृती खिडक्यांवरून हे अलंकरण निर्माण केलेले आहे. शिखराच्या पहिल्या मजल्यावर चौरसाकृती दिखाऊ दालन त्याच्या सभोवार चारी बाजूस लहान आकाराच्या मंदिरांचा हार किंवा वरून गोलाकार असलेल्या 'शाल युक्त आयताकृती मंदिरांच्या रांगा व कोपऱ्यावर घुमट असलेले कूट अशी रचना आहे.



हार व दिखाऊ दालनाच्या भिंती यामधून जाण्यासाठी उघडा चौफेर मार्ग आहे. दुसरा व तिसरा मजला उत्तरोत्तर कमी आकाराचे व अरुंद आहेत. तथापि त्यावरील रचना पहिल्या मजल्यासारखीच आहे. तिसऱ्या मजल्यावर अष्टकोनी शिखर आहे. ही सर्व रथमंदिरे वरून कोरण्यास प्रारंभ करून शेवटी खालचे व आतील कोरीव काम करण्यात आले. 'आधी कळस मग पाया' ही म्हण येथे अक्षरशः लागू पडते.



अर्जुन रथाची रचना अगदी याच रथाप्रमाणे आहे. फक्त तीन ऐवजी दोन मजले आहेत. भीम रथ व गणेश रथ हे आयताकृती आकाराचे आहेत व त्यावर आयताकृती परंतु वरून आडवे गोलाकार शिखर आहे. त्यावर कळसांची एक रांग आहे. ही शिखरे शाला प्रकारची आहेत. भीम रथाला वरचा एक मजला आहे व त्याच्या सभोवार हार आहे. गणेश रथ वरचे दोन मजले आहेत. ही भीम रथाच्या पुढची पायरी आहे. त्यातूनच पुढे गोपुरांची निर्मिती व विकास झाला. पल्लव राजांनी बांधीव मंदिरेही बांधली. त्यापैकी प्रमुख म्हणजे महाबळीपुरम येथील समुद्रकिनाऱ्यावरील देऊळ आणि कांचीपुरम येथील कैलासनाथ मंदिर ही होत. कैलासनाथ मंदिरा सभोवतीच्या तटाला लागून आतील बाजूस अनेक लहान लहान मंदिरे आहेत. व मुख्य विमानाला जोडलेली पाच वेगळी लहान मंदिरे आहेत.

पल्लव शिल्पकारांची सर्वोत्तम व अपूर्वकृती म्हणजे समुद्रकिनाऱ्यावरील एका प्रचंड शिळेवर कोरलेली 'गंगावतरण शिल्प' होय. याची लांबी २७ मी. उंची ९ मी. आहे. या प्रचंड शिल्पपट्ट्यात भगीरथ राजाची तपश्चर्या आणि गंगादेवीचे पृथ्वीवर अवतरण हे विषय साकार केले आहेत. शिल्पासाठी अखंड दरड असलेला हा शिलाखंड निवडलेला आहे. त्यास नैसर्गिक तडा गेला असून या फटीचा फारच कौशल्याने उपयोग करून घेण्यात आला आहे. या घळीत नागराज, नागदेवता, नागस्त्रिया यांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. या शिलाखंडाच्या माथ्यावर एक प्रचंड कुंड बांधण्यात आले होते. त्यातून या फटीत सतत पाणी सोडण्यात येई. म्हणजे जणू प्रत्यक्ष गंगाच. गंगेच्या दोन्ही बाजूस पाणी नेणारे ऋषिमुनी दिसतात. तसेच जलप्राशनासाठी आलेले मृगादी प्राणीही आहेत. कथेचा मुख्य नायक आहे भगीरथ. तो दोनदा दिसतो. एकदा हात वर करून तपश्चर्या करताना व दुसरा शिवाचा आशीर्वाद स्वीकारणारा. शेजारी पल्लव शैलीतील विष्णूचे मंदिर दिसते. तेथे उपासना करणारे मुनी आहेत. पलीकडे तप करणारे उर्ध्वबाहू मार्जार व त्याभोवती बागडणारे मूषक आहेत. गंगेच्या पुण्यक्षेत्राची महती वर्णन करताना महाभारतकारांनी ही कथा वर्णिली आहे. येथे सहशत्रू असणारे प्राणीही मित्र बनतात. हा कथाभाग कोरला आहे. या शिवाय आकाशगामी विद्याधर, गंधर्व तसेच इंद्रादी देवदेवता आहेत. त्यातल्या एका प्रचंड गजमूर्तीचा निर्देश स्वतंत्र करावा अशीच आहे. हत्तीचा कळप दाखवला आहे. एकेका रूपकाच्यापेक्षा सर्व देखाव्याचा एकत्रित परिणाम वेधक होतो यात शंका नाही.

पल्लव शिल्पातील सर्वोत्कृष्ट कृती म्हणजे वरील भव्य शिल्पाच्या समोर असलेले दोन माकडांचे शिल्प होय. हे सर्वतोरचित शिल्प आहे. माकडांच्या स्वभावाची योग्य जाण

व त्यांच्या मूलभूत रूपाचा घडीव शिल्पातील आविष्कार यामुळे हे शिल्प अतुलनीय झाले आहे. भारतीय कलेतील चेतना या गुणाचे ते मूर्तीमंत प्रतीक आहे.

संकलन - **सौ. मंजिरी दांडेकर**
कलाशिक्षिका
डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.ठाणे)

संदर्भ


- भारतीय कलेचा इतिहास - श्री.श्री. ह. शहाणे
- भारतीय कलेचा इतिहास - प्रा. जयप्रकाश जगताप
- A History of Fine Arts in India & the west - Edith & Tomary
- संस्कृतिकोश



दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा !




(पान क्र. १८ वरून)

## डॉ. मो. दि.पराडकर यांचे आत्मकथन

त्यांच्याच राणे नावाच्या वकिलांने त्यांना असं सांगितलं की ही केस तुम्हाला फार जड जाईल. पराडकरांनी एकेकाळी असं ठरवलं होतं की मधले २ महिने काहीही आर्थिक मोबदला न स्वीकारता कॉलेजचं काम करण्यास आपली तयारी आहे (अर्थात् त्यामुळे माझी बाजू नैतिकदृष्ट्या अधिक बळकट झाली असती हे नवनीतभाई ओळखून होते त्यामुळे त्यांनी तेही नाकारले होते) तुम्ही त्यांना करू दिले नाहीत. शिवाय अस्तित्वात नसलेला राजीनामा स्वीकारलात. तेव्हा माझा असा सल्ला तुम्हाला आहे की, तुम्ही काहीतरी समझौता करा. मग तडजोडीचा अटी. तर आमच्या नवनीतभाईचा सल्ला असा होता (समाजवादी सल्ला !) की आम्ही तुम्हाला डिक्री तर दिलेलीच आहे तुम्ही ती स्वीकारा आणि तुमचा क्लेमही सोडा !! मी म्हटलं हा जर तुमचा समन्वयाचा सल्ला असेल तर मी तो मागायला आलो नव्हतो, एवढं तुम्ही लक्षात ठेवा ! आमच्यातर्फे जे शहा म्हणून वकील होते ते म्हणाले, 'तुम्हाला समन्वय हवा असेल तर तुम्ही किती लाख देणार ते सांगा.' ५-६वर्षांचा प्राचार्यांचा पगार आहे. तुम्ही काही भाषा बोलत असाल तर ठीक.' मग करंदीकरांनी सल्ला मला असा दिला की, तुम्हीही फार ताणू नका. तुमचा नैतिक विजय झालेलाच आहे. ते जर तुम्हाला पुन्हा स्वीकारीत असतील तर आपण असं ठरवू की त्यांनी तुमचा राहिलेला पगार देण्याचा प्रयत्न करावा आणि जे तुम्हाला सरकारकडून मिळेल (प्राचार्य म्हणून तुमच्यापोटी त्यांना मिळेल) तेवढा त्यांनी तुम्हाला द्यावा आणि प्राचार्य म्हणून स्वीकारावं.

- डॉ. मो.दि. पराडकर

# ज्ञानक्षेत्रातील साम्राज्यवाद

*ज्ञानक्षेत्रातही साम्राज्यवाद आढळतोच, ज्ञानाचे हेतू काय असावेत इ. प्रश्नांचे तरंग मनात निर्माण करून विचाराभिमुख करणारा हा लेख. - संपादक*

विद्या प्रसारक मंडळाच्या दीपज्योति व ग्रंथ ह्या प्रतीकावर 'प्रज्वालितो ज्ञानमय प्रदीप: ॥' हे ब्रीद वाक्य विराजमान आहे.

तसेच ठाणेनगर वाचन मंदिर ह्या ग्रंथालायच्या वास्तूवर ''॥ न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥'' असे सुभाषित आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालयात 'सरस्वती' देवीची प्रतिमा आहे व ती विद्येची देवता आहे. प्रत्येक समारंभात तिच्या फोटोला हार घालून सुरुवात होते.

ठाण्यातील ह्या तीनही संस्था कोणते ध्येय व भूमिका घेऊन कार्यरत आहेत? ह्या संस्था तर देशातील अनेक तत्सम संस्थेच्या प्रातिनिधिक स्वरूपाच्या प्रतिमा होत.

इथे ज्ञानाची कांस आहे व ज्ञानाचे आदानप्रदान पुढच्या पिढीला हवे या उद्देशाने 'कॉर्पोरेट' (अमर) स्वरूपात ह्या संस्था उभ्या आहेत.

पण त्या स्वतंत्र आहेत का? कोणत्या पद्धतीचे ज्ञान त्या वितरित करीत आहेत? त्यांना कोणी बांधून घेतले आहे - कसे - कां व परिणाम कोणता? मला इथे कोणताही व्यक्तिगत किंवा संस्थेवर टीका करण्याचा हेतू नाही. तर ह्या व अश्या संस्था आज अजाणतेपणे बहुतांशी एका ज्ञानाच्या क्षेत्रातील साम्राज्यवादाच्या गुलाम झालेल्या आहेत असे ठामपणे प्रतिपादावयाचे आहे.

हा साम्राज्यवाद छुपा न जाणवणारा व नवनव्या पिढीतील जीवांना ह्या 'जागतिक साम्राज्याच्या गुलामगिरीत सामील करून घेतो आहे,' असे म्हणावयाचे आहे. कसे ते पुढे पाहू या. हा दोष त्यांचा नसून समाजाचा, सरकारचा आहे.

जगावर कुठल्या प्रकारच्या ज्ञानाचा अंमल आहे. त्या ज्ञानाचा हेतू काय आहे? ही ज्ञानाची पद्धती कोणत्या सत्ताप्रकाराने राबवण्यात येत आहे?

ज्ञानाच्या - मानवी ज्ञानाच्या दोन मुख्य शाखा आहेत. एक म्हणजे ह्या पृथ्वीवर असलेल्या दृश्य व जड आणि नाशिवंत वस्तू व नियम यांना सत्य व ऋत मानून, ह्या जड जगाच्या भोगवृत्तीत समाधान मानावयाला शिकवणारे ज्ञान. ह्या क्षणैक भोगाच्या समाधानासाठी टेक्नालॉजी, संशोधन ह्यांना 'फंडामेंटल रिसर्च' असे गोंडस व उघड उघड फसवे वर्णन करणाऱ्या पद्धतीच्या ज्ञानाला 'सत्यज्ञानाचे पद बहाल करणारी व्यवस्था. ह्या व्यवस्थेचा आधार सध्या ज्याला 'मॉडर्न सायन्स' म्हणतात त्या न्यूटन, आईनस्टाईन, फ्रॉन्सिस बेकन व डेस्कार्ट यांच्या विचारपद्धतीत आहे. सेक्यूलर, धर्मनिरपेक्ष, फक्त बुद्धी व 'रीझन' ह्यावर आधारलेला. सबजेक्टिव्हिटीला दोषी समजणारा विचार. स्वत:च्या ज्ञानाला 'ऑबजेक्टिव्ह' किंवा वास्तववादी समजणाऱ्या 'हृदयशून्य ज्ञानाला' सध्यातरी जगाच्या ज्ञानसिंहासनावरची जागा मिळाली आहे.

ह्या साम्राज्यवादाचा अंमल प्रचलित राज्यपद्धती, शिक्षणपद्धती, संस्कारशून्य शिक्षण, पाश्चात्य युरोपियन संस्कृतीला श्रेष्ठत्व प्रदान करणारा जीवनव्यापार, ह्यामार्फत चालतो. ह्या साम्राज्याची संपत्ती ही लोकशाही 'मॅनेज' करून ज्ञानाच्या ह्या मॉडेलची सत्ता त्रिकालाबाधीत

कशी राहील ह्या पद्धतीने खर्च केली जाते. ती संपत्ती तुम्हीच निर्माण करता पण तिचा व्यय ह्या पक्षपाती वितरण पद्धतीने केला जातो.

एव्हढेच नव्हे तर जॉन रॉल्स ह्यांचा एक विचार लाथाडून हा व्यवहार केला जातो. ''रॉल्सियन इक्विटी'मधला विचार असा आहे की ह्या पृथ्वीवरून अस्ताला जाणाऱ्या पिढीला नवीन जन्माला येणाऱ्या मानवी जीवांना कुठल्याही एका विवक्षित विचारप्रणालीला वा जीवनपद्धतीला बांधून घेण्याचा हक्क पैदा होत नाही. पण, प्रत्यक्षात नेमके उलटेच होते आहे.

त्यामुळे जगभर ह्या पद्धतीच्या ज्ञानसाम्राज्यवादाबद्दल वैचारिक संघर्ष चालू झाला आहे. भारतात राजकीय पक्षात म्हणजे कॉंग्रेस व बी.जे.पी. ह्यांच्यातला शिक्षणक्रमाबद्दलचा हा वाद ह्या जगड्व्याळ वादळातील एक छोटासा वाऱ्याचा झोत आहे. त्याचे स्वरूप स्पष्ट नाहीच व त्या वादाच्या प्रेरणा त्या पक्षांनाही माहित नाहीत. कारण त्या भौतिक नसून 'स्पिरीच्यूअल' आहेत. कसे ते आपण पुढे पाहूंच !

आपण सर्वजण एका ज्ञानाच्या साम्राज्यसत्तेचे गुलाम आहोत. आपल्या जन्मापासून आपण ह्या पृथ्वीवरच्या एका विशिष्ट गुलामगिरीचे कैदी आहोत. गुलामाला हे जोखड झुगारून देणे अशक्य नसते, पण जर त्याला ह्या गुलामीची जाणीव झाली तर आणि ती होणे अशक्य करणारी मानवी सोशल, पोलिटिकल, इकॉनॉमिकल आणि सर्वात महत्त्वाची म्हणजे 'एपिस्टेमॉलॉजिकल' (ज्ञानशास्त्र) जीवनपद्धती इथे ह्या पृथ्वीवर मानवी समाजव्यवस्थेमध्ये सिंहासनावर विराजमान आहे.

जोसेफ चिल्टन पियर्स ह्यांची केंसी वॉकर ह्यांनी २० मे १९९८ ला घेतलेली मुलाखत बघा.

Casey Walker : Will you begin by assessing education as we know it today?

<u>Joseph Chilton Pearce</u> : Over the past thirty years, I have given some 2,500 talks to thousands of people on these issues, and it seems our whole Nation's mental set is too locked into a radical denial over education. I am pessimistic because of our capacity for denial. What 14th Century Spanish Sufi Arabi, called "our enormous capacity for self-deception" and our simple desire to maintain things as they are. The other criticism, of course, lies in looking at schooling as a concept. I do not think it is at all correctable as it is."

Further, the school system produces as John Gatto Claims - exactly what the system needs to keep itself going, and that is uncorrectable. We cannot change institutions."

ह्या विचारांच्यामागे 'न्यूरोकार्डिऑलॉजी' (neurocordiology) चे क्रांतिकारी संशोधन आहे. पण, ते अश्या अवस्थेत व सामान्य बुद्धीच्या आवाक्याबाहेर आहे की हे संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांनाही त्यांच्या महत्त्वाची जाणीव व कल्पना नाही.

हृदय म्हणजे काही 'मेकॅनिकल पंप नाही' तर ते एक शुद्ध (सत्य व पवित्र) ज्ञानाचे साधनही आहे असे रूडॉल्फ स्टीनर (Rudolf Steiner) हे शास्त्रज्ञ सांगतात. ह्या हृदयाचे वर्णन ते 'Holographic Heart' असे करतात.

Descarte's Error ''डेस्कार्ट (पदार्थ विज्ञान व गणिताचा फ्रेंच शास्त्रज्ञ) ची <u>चूक</u>'' ह्या ग्रंथात डेमाशियो म्हणतात, की भावनेला बुद्धीच्या निर्णयात महत्त्वाची जागा आहे आणि हा निष्कर्ष 'Pre-fronal Lobes' ह्या

मेंदूतील भागावरच्या अभ्यासातून निघतो.


पण ह्यामुळे कोणती मोठी चूक मानवी समाजाने ज्ञानाच्या इतिहासात केली.

Descarte's neurophysiological error (Damasio 1944) of presupposing one mind, one brain, in humans has led the global thinkers to cover the global village with one universal metaphorical blanket: Global Ethics. For these policy makers humans are defined by ethics, personal social and global. But these ethics are only of 'THE HEAD ETHICS', as described above. You behave as the latest written rules demand."

आणि जर ह्या ब्रेननैतिकतेला माणसाने आव्हान द्यावयाचे ठरविले तर फारच उशीर झालेला असतो. हे नीतिशास्त्र राजकीयशास्त्र बनते किंवा कायद्याचे स्वरूप घेऊन डोळे वटारून बसलेले असते. हेच नीतिशास्त्र मग ज्ञानशास्त्राचा कब्जा घेऊन बसते. कशाला 'शहाणपण' म्हणावयाचे ह्याची व्याख्या करून बसते. आणि अशाप्रकारे शिक्षणपद्धती, लोकशाही, राजसत्ता, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, न्यायसंस्था ह्या सर्वांचा कब्जा घेते. नवीन जन्माला येणाऱ्या जीवाला ह्या नैतिकतेने बंदिस्त ज्ञानपद्धतीने एका विशिष्ट 'पॅरडिम'मध्ये गुलाम करून टाकते. मग ह्या सिंहानस्थ सम्राटाला म्हणजे 'ग्लोबल सर्वसाधारण धारणेला' तो मानव आव्हान देऊ शकणाऱ्या 'स्वातंत्र्याला' पूर्ण गमावून बसतो. तो नुसताच गुलाम न राहता नकळत त्याचा वकीलही बनतो. ह्या नवीन 'पॅरडिमचे' नाव आहे. "Bio-cultural Practigm" आणि त्याचे संशोधन आहे Dr. Maria Culavito (1995) ह्या स्त्री संशोधकाचे.

सोबत chart one आणि 'The Biocultural Pardigm' appendix one जोडले आहे. त्यातील क्लिष्ट परिभाषेत न जाता फक्त कोणते महत्त्वाचे निष्कर्ष निघतात ते सांगतो.

१) प्रत्येक मानवाला एक मेंदू नसून ५ वेगवेगळे 'इंटलिजन्स सेंटर्स' आहेत आणि ते त्याला विश्वाच्या



In the first chart, taken from *Evolution's End*, by Joseph Chilton Pearce we discover the process of the unfolding of our human intelligence systems. This process takes place in every member of our species. For our purposes, we must keep in mind that each brain center has a finite open phase-a growth spurt, and at age 11, we all go through a mental pruning process where nature removes all weak neural connections between these early systems and the neocortex, leaving us with the same brain weight we had at 18 months. It's estimated that some 80% of our neural ...ns disappears at this age. So by age 11 or so, our heretofore malleable world view becomes more rigid. While we are still able to "learn more things" after this process, HOW WE learn them is now conditioned by our world view, biologically. To outline examples of what we mean by this, let us now consider chart two.

Chart Two delineates by bioculture the unfolding of the model imperatives producing each of these intelligence systems. While the nature imperatives outline the open window phases and sequential development of the anatomy, the nurture imperatives direct the actions of the primary caretakers of the developing child (mother, father, family unit, siblings, etc.). The cultural imperatives serve as both "remedial intervention" (when the primary caretaker is delinquent) and as "neural reinforcement" (to strengthen the initial circuitry to assure long term retention). Thus, the emerging child in a way is born *in medias res*, in many ways conditioned by both the dictates of the society in which he/she is raised (through education) and in other ways a product of his/her caretaker's world view, seemingly leaving little room, if any for an emerging free self to burst forth. So how then to create such a free human?

The Biocultural Paradigm
(APPENDIX ONE)

| Bioculture | Nature Imperative | Nurture Imperative | Cultural Imperative | Primary Sense | Form of Knowledge |
|---|---|---|---|---|---|
| MAIA | reptilian, amygdala/septal regions of limbic | prenatal conditioning, mother/ child bonding, (autonomic nervous system threshold) | athletics dance ritual asceticism | kinesthesia | memory of "body states" control of autonomic function |
| MYTHOS | limbic system (hippocampus), prefrontal cortex | name-thing exploration in "nest" environment (pleasure conditioning circuitry) | live story telling, dance, unstructured play, music appreciation | auditory, visual (geometric) | working memory, discrimination of rhythm, pitch,volume, and melody perception, visuo/spacial acuity |
| R. BRAIN MIMETIC | right hemisphere, visual cortex | name-thing exploration outside nest environment (fear conditioning circuitry) | visual arts/drama/puppetry, role playing games,organized athletic games | visual ( imagistic) | self development and discrimination, scanning, screening,depth and distance acuity, color discrimination, and 3D spacial perception |
| L. BRAIN* MIMETIC | left hemisphere of neocortex | conformity to societal proscriptions ( ie. laws, organized religions) | reading arithmetic grammar logic | visual (conceptual) | comprehension of "objectivity" "universals", values based ideals, ethics, conceptual differentiation, theory making |
| LOGOS* | left hemisphere "interpreter module", amygdala | reliance on expert authority, knowledge through external data collection, rules, infallible dogma | technological proficiency (ie. use of instrumentation) rhetoric,astronomy | digital (kinesthesia+ visual/ conceptual) | BELIEFS opinion formation, ideology, fundamentalism, agnosticism |
| MYTHOS* | prefrontal cortex, heart | communal living, conflict resolution, stress management, homeostasis | dialectics, spiritual exercises, communal rites of passage , music, geometry | empathy (working memory+ group homeostasis) | heart intelligence, intuition |

* secondary biocultures (adult only)



निरनिराळ्या भागांचे ज्ञान देण्यासाठी बांधलेले आहेत.

२) जन्मसिद्ध असे जे 'ज्ञानतंतूचे नेटवर्क' मुक्त, (open) असते ते वयाच्या ११ वर्षानंतर 'हार्ड' म्हणजे 'कठीण' होते व जुने अशक्त तंतू बदलून नवीन नेटवर्क सृष्टि पक्के करून टाकते. त्यामुळे जगाबद्दलचा दृष्टिकोन 'घट्ट' बनून जातो.

३) त्यानंतर आपण नवीन 'ज्ञान' मिळवतो परंतु ते ह्या 'घट्ट' फिल्टरमधून जे प्राप्त होईल असे conditioned संस्कारित व बांधलेले मिळते-मुक्त नव्हे.

ह्या पॅरेडिमचा पराक्रम म्हणजे Biology (Nature) आणि Culture (Nurture) एकमेकांवर 'न्यूरोकल्चरल इन्फरमेशन'चे 'कंडीशनिग एजंट' वा 'पॅरामिटर' बनतात. म्हणून मग "Culture conditions and stimulates biology while biology conditions and makes culture possible."

थोडक्यात म्हणजे ज्या 'बुद्धीप्रमाण्य नैतिकतेत' आपण जगतो ती क्रिया वयाच्या ७ वर्षाच्या आतच एका प्रकारची सांस्कृतिक व बायोकल्चरल वैचारिक गुलामी प्रवृत्तीत बांधली जाते. स्वातंत्र्य गमावून बसते व एका दृष्टीने 'अनैतिक' बनते.

सृष्टीच्या उद्दिष्टापासून फारकत घेऊन हा समाज नवीन जीवाचे स्वातंत्र्य ह्या मानवी पद्धतीने हिरावून घेतो. त्यामुळे हेच शास्त्रज्ञ भारताच्या वेदिक ज्ञानाच्या व जन्मसंस्कार व गर्भसंस्कारांच्या विचारांचा आदर करू लागले आहेत. उदा. श्रोडिंजर स्त्री पुरुष संघर्षाच्या ह्या नव्या जमान्यात ही मानवी जात नैसर्गिक मातृत्वाच्या संस्काराच्या क्रियेला पारखी बनते कारण ह्या Heart Culture चा संस्कार ह्या मातृत्वाच्या भूमिकेतून होणार असतो.

त्यामुळे ह्या कृत्रिम मानवनिर्मित व प्रचलित राजसत्तेच्या तालमीत वाढणाऱ्या बुद्धीप्रामाण्यवादी, हृदयशून्य, भावनाशून्य कल्चरचा परिणाम काय होतो, तर सृष्टीच्या नैसर्गिक संस्कार पद्धतीवर बडगा आणून तसेच कौटुंबिक मातृत्वाच्या संस्कारांना कमी लेखून किंवा त्यांना विकृत करून Status Quo प्रचलित पद्धतीचा बलात्काराने स्वीकारलेल्या व Industrial व भौतिकवादी, निधर्मी संस्कृतीचे पाईक गुलामांच्या फॅक्टऱ्या ह्या निर्माण करणाऱ्या शिक्षणसंस्था, वाचनालये, युनिव्हर्सिटीच चालवू लागतो. ज्ञानाचा हेतू हा मुक्त वा स्वतंत्र न राहता त्याचा utilatarian म्हणजे फक्त 'उपयोक्त' पद्धतीत बदल करण्यात होतो.

त्याचे अत्यंत बोलके प्रयोग डॉ. मेरिया एम् कोह्याव्हिटो हिने केले त्याचे वर्णन खाली आहे.

एका वर्गात हुशार म्हणजे शाळेच्या व्याख्येत व वर्तनात बसणाऱ्या मुलाचा एक गट A व दुसरा ह्या शाळेच्या बाहेरील (अशिक्षित त्या अर्थाने) असा व बुद्धीवर कुठचाही एक ठराविक संस्कार नसलेला दुसरा गट B ह्यांना काही कोडी घालण्यात आली.

Beard, Board and Bird ह्या तीन शब्दांना कोणत्या नात्याने जोडले आहे. हा प्रश्न विचारला होता त्याचे 'A' गटाचे उत्तर असे होते - हे तिन्ही शब्द एका 'सिलेबलमध्ये' आहेत, सगळे B ह्या शब्दाने सुरु होतात. आणि शेवट rd ह्या शब्दांनी होतो. हा साचेबंद विचार होय.

'B' गटात मुले विचारात पडली होती पण त्यातल्या एका मुलाने उत्तर दिले की त्यांच्यामध्ये तीन्ही शब्दात काहीही साम्य नाही, पण त्यांना Black हा शब्द लावला जातो व अर्थ प्राप्त होतो. (Black Beard, Black Board आणि Black Bird)

पण 'A' गटानी नाराजी व्यक्त केली. ''एक नवीन शब्द मदतीला घ्यावयाला हरकत नाही, असे आम्हाला का सांगितले नाही आधीच?'' ही बंदीस्त किंवा परावलंबी वृत्ती.

मग त्यांना आणखी तीन नवीन शब्द दिले. Light, Head, Wood तेव्हा दोन्ही गटांनी Red शब्द जोडला हे उत्तर दिले. (Red Light, Red Head and Red wood)

त्यानंतर Hatchet, wood, saw, Hammer हे शब्द दिले आणि ह्यातला कुठला शब्द विसंवादी आहे हा प्रश्न विचारला त्याबरोबर A गटाने wood हे उत्तर बरोबर दिले. सामान्य विचाराने पण, B गटात निराळाच विचार प्रवाह चालू होता त्यांनी विचारले - 'डॉ. कोलाव्हिटो

हे वुड (wood) किती मोठे आहे? एखादा २' x ४' असा तुकडा की झाडाचा बुंधा?

डॉ. कोलाव्हिटोनी विचारले की ह्या माहितीची काय जरूरी? तेव्हा उत्तर आले. 'वा, वा असे कसे - कारण हे लाकूड किती मोठे आहे यावर हॅचेट, करून किंवा हातोडा ह्यातले कुठले हत्यार 'विसंवादी' आहे हे ठरू शकते.''

ह्या प्रयोगांचा निष्कर्ष असा निष्कर्ष असा निघाला की दोन्ही गटामध्ये फार मुलभूत फरक ज्ञानाच्या प्रक्रियेमध्ये आहे.

डॉ. मेरीया म्हणतात - "For 'B' students, the goal of their education - teleology, if you will, was to know themselves better, while the goal of 'A' class was to know world better.."

प्रतिनिधिक 'अ' गट हा "How we leam them is conditioned by our wold view bilogically." 'B' गट मात्र ह्या चरक कारखान्यापासून थोडा स्वतंत्र दिसला. 'B' गटावर रेजिमेंटेशन नव्हते. विचारपद्धतीला बांधले नव्हते. कल्पनाशक्तीवर सीमा लादल्या नव्हत्या. त्याचा परिणाम.

या संशोधनाचा निष्कर्ष एव्हढाच निघू शकेल की मानवाला ह्या नवीन "Bio Cultural Parchgm" बद्दल जागृत रहावे लागेल. जर त्या मानवाला निसर्गाच्या ज्ञानप्रदान करण्याच्या क्रियेत अडथळा - कृत्रिम अडथळा आणावयाचा नसेल तर आणि मानाच्या ज्या सूप्त प्रेरणा व शक्ती आहेत त्यांचा फुलोरा ह्या पृथ्वीवरच्या नंदनवनात बहरावा अशी इच्छा असेल तर !!

पण, मानवी इतिहासात कोणत्या प्रकारचा साम्राज्यवादी ज्ञानसत्तेचा वापर झालेला आढळतो. तर एक म्हणजे भारताबद्दल बोलावयाचे झाल्यास मुस्लिम, हूण आणि तुर्क रानटी टोळ्यांनी जी राजसत्ता गाजवली, त्यामध्ये त्यांच्या विशिष्ट संस्कृतीखाली अनेक पिढ्यांची ज्ञानप्रक्रिया रत्रवली. तिचे फायदे व तोटे हे बघता येतीलच. तसेच आर्यसंस्कृतीबद्दलही विचार करता येईल. पण राजसत्ता शिक्षणपद्धती व संस्कृतीवर किती अंमल करतो हे पहाण्यासारखे आहे. नुकत्याच १५० वर्षाच्या ब्रिटिश राजसत्तेच्या अंमलाखाली मेकॉले व विल्यम कॅरी यांच्या विचारधारेतून जाणीवपूर्वक व योजनाबद्ध पद्धतीने जी ज्ञानपद्धती लादली गेली तिच्या अंमलातून आजची भारतीय जनता अजूनही बिलकूल बाहेर आली नाही. ह्या गुलामगिरीची जाण नाही, खंत नाही. ह्या पद्धतीचा गाढा अभ्यास डॉ. विजय बेडेकर यांनी केला आहे, त्यामुळे मी त्यात जास्त चर्चा योजिली नाही. पण तरीदेखील केवळ स्मृती करिता काही संदर्भ देतो.

"In 1831, Thomas Macaulay articulated the goals of British Colonial imperiatism most succictly. "We must do our best to form a class who may be interpreters between us and the millions whom we govern, a glass of persons Indians in Blood and Colour, but English in taste, in opinions, words and intellect."

Christian Missionaires such as William Carey anticipated the need for British educators to learn Sanskrit and transcribe and interprete Sanskrit texts in a manner compatible with colonial aims."

"To gain the ear of those who are thus deceired, it is necessary for them to believe that the speaker has a superior knowledge of the Subject. In those circumstances a knowledge of Sanskrit is valuable. As the person thus misled, perhaps a Brahman, deems this a most important part of knowledge, if the

advocate of truth be deficient therein, he labors against the hill; presumption is altogether against him."

त्यामुळे ब्रिटिशांच्या हातात इथला इतिहास संस्कृती शिक्षणपद्धत, ज्ञानाचे मार्ग, न्यायपद्धती वगैरे वगैरे सर्व बदलून साम्राज्याला अनुकूल Regimentation करण्याच्या किल्ल्या गेल्या. अजूनही त्या तशाच आहेत ही दुर्दैवाची बाब आहे.

आता आणखी एक ग्लोबल, भौतिकवादी व एकतंत्री अमेरिकन कॅपिटलिझमच्या संस्कृतीखाली आपण भरडले जात आहोत. त्याच्या सविस्तर चर्चेमध्ये जाण्याकरिता आपल्याला वेळ नाही. पण तरीही काही संकल्पना मात्र फक्त नावाने मांडतो सूत्रपद्धतीने...

उच्च शिक्षणाचे मार्केटीकरण. ज्ञानाऐवजी फक्त इंफर्मेशन, कंझूमर सोसायटी, मीडिया सोसायटी, इलेक्ट्रॉनिक सोसायटी, टेक्नॉलॉजी वगैरेचे संस्कार. ज्ञान व तंत्र यांचा मिलीटरी उद्दिष्टांसाठी संशोधन व वापर व्यापार व जाहिरात या तंत्राचा वापर, भोगसंस्कृती व बेलगाम हळस ह्या गोष्टी नकळत ह्या भारतीय संस्कृतीचा घोट घेत आहेत व शिक्षणपद्धतीतही ह्या विषवृक्षाची लागवड पुढच्या अनेक पिढ्यासाठी लावून जात आहेत. पण ब्रिटिश संस्कृतीच्या गुलामांना याची खंत वा प्रतिकार करण्याची शक्ती कुठून असणार?

सगळ्यात खेदाची गोष्ट ही की भारतीय संस्कृतीत वैदिक विश्वदृष्टिकोनावर आधारलेली आजच्याही युगात अतिशय उच्च मूल्याधिष्ठित शिक्षणपद्धतीबद्दलचे पूर्ण अज्ञान. ह्याचे मुख्य कारण ब्रिटिश व युरोपियन संस्कृतीचा पगडा, वेदांच्या अर्थ लावण्याच्या पद्धतीतील दोष, भौतिक भोगवृत्तीकडे कल व भौतिक विज्ञानांतील टेक्नॉलॉजीच्या प्रभावाने दिपलेले डोळे आणि पगडा घेतलेली जीवनपद्धती व राजकीय, सामाजिक व आर्थिक अंमल.

तेव्हा वैदिक ज्ञानपद्धती की जिचे वर्णन ''स्पिरीच्यूअल पॅरेडिम'' असे नवीन मॉडर्न भाषेत करण्यात येऊ शकेल, त्या पद्धतीचे थोडक्यात वैशिष्ट्य काय ते पाहूया. हा विषय मोठा आहे, पण जगात जे अनेक पॅरेडिम अस्तित्वात आहेत, त्यामध्ये ह्या श्रेष्ठ भारतीय पद्धतीच्या पॅरेडिमचा विचार दृढ झालेला नाही. त्याचे योग्य मूल्यमापन भारतातच होत नाही तर इतरत्र कसे होणार? पण, सुदैवाची गोष्ट ही की केवळ त्या पद्धतीच्या गुणवत्तेमुळे इतर पद्धती मागे पडतील व या वेदिक स्पिरीच्युअल शिक्षणपद्धतीकडे सगळ्या जगाला नव्हे विश्वालाच वळावे लागेल.

मुख्य म्हणजे ज्या मानवी जीवनाचा मृत्यू तत्वामुळे खंडित विचार केला जातो त्याऐवजी ह्या भारतीय पद्धतीत पृथ्वीवरचे जीवन व मृत्यू व पुनर्जन्म ह्या वैश्विक सलग चक्रीय वा स्पायरल जीवनाचा विचार मांडला जातो. भगवद्गीतेत अर्जून कृष्णाला विचारतो की त्याने १८ अध्यायात सांगितलेले 'ब्रह्मज्ञान' त्याच्या मृत्यूबरोबर विलयाला जाईल काय. त्याचे उत्तर त्याला मिळते की बिलकूल नाही. त्याच्या पुढच्या जन्मी त्याचे सातत्य अबाधित राहील व त्याचा जन्म अशाच सुयोग्य ठिकाणी व वेळी होईल की ह्या ज्ञानाची पूर्णता करण्याची त्याला संधी मिळेल.

दुसरा महत्त्वाचा मुद्दा हा की ज्याला हे ज्ञान मिळणार त्याला मृत्यू आहे व त्याला स्वत:च्या अस्तित्वाचा बोध नाही. मग त्या ज्ञानसंस्काराचा उपद्व्याप कशासाठी? हे ज्ञान त्याला योगमार्गाने मिळवून देण्याचा मुख्य प्रयत्न स्पिरीच्यूअल पद्धतीने त्याला या पद्धतीत मिळवून देता येतो व तशी आश्रमपद्धतीत गुरुकुलात व्यवस्था व यंत्रणा होती. हेच ते आत्मज्ञान व आत्मबोध.

तिसरा मुद्दा की ज्ञानाची प्रक्रिया होण्यासाठी जी यंत्रणा व साधने त्याला मानवी देहात जन्मत:च उपलब्ध आहेत, त्यांचा परिचय व त्यांची क्षमता वृद्धींगत करण्याची साधना त्याला शिकवण्यात येत होती. त्यामध्ये ह्या विश्वाचे खरेखुरे

सत्य, ऋत (Eternal) दर्शन होण्यासाठी ही इंद्रिये व ज्ञानसाधने शुद्ध करण्याची जरूरी पटवून त्याच्याकडून त्याला आवश्यक असणारा आचारधर्म शिकवला जात असे.

मानवी ज्ञानेंद्रियाच्या मर्यादित क्षमतेमुळे वैश्विक ज्ञानाचा आवाका या बोझ न पेलण्यासारखा असल्याने इंद्रियातीत, अवस्थात्रयातीत, गुणातीत, कालातीत अश्या ज्ञानप्राप्तीसाठी (म्हणजे True Reality आणि True objectivity) त्याला 'शक्ती जागृतीची' संधी देण्यात येत असे. हा भारतीय संस्कृतीतील फार मोठा शोध आहे. ह्याला Transcendent Knowledge पद्धती म्हणता येईल.

ज्ञानेश्वरीतील कुंडलिनी जागृतीचा उपदेश व भगवद्गीतेतील ११ व्या अध्यायातील दिव्यचक्षूचे अर्जुनाला दान हे ह्या तत्वाची ठळक उदाहरणे होत.

'अभ्युदय' व 'नि:श्रेयस' सुखाच्या कल्पना व भेद हा ह्या शिक्षणपद्धतीतील विशेष जीवनातल्या सगळ्या धावपळी सुखासाठी होतात. पण सुखाची उच्च पातळी कोणती व प्राणी स्तरावरची कोणती, हे जाणीवेत उतरवले जात असे.

तसेच पृथ्वीवरच्या जीवनाचा खरा 'अजेंडा' कोणता ह्याची जाणीव देण्यात येत असे. ज्ञानाच्या खऱ्या, पूर्ण व बिनचूक संक्रमणासाठी गुरु शिष्य संबंध एका पवित्र वैश्विक पातळीवर, संस्कारावर बांधले जात असत. 'मेधाशक्तीची देणगी सूर्यापासून मिळवण्यासाठी गायत्री मंत्र तंत्र हेही उपनयनामध्ये शिकवण्यात येत असत.

मानवी शरीराच्या व मनाच्या ज्या बायालॉजिकल अवस्था - बाल ब्रह्मचर्य गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास ह्या चार आश्रमाच्या योग्य काळात योग्य जीवनपद्धती आखून समाजात त्या रूढ करून ठेवल्या होत्या.

ज्या जीवनमूल्यांचा साठा नैसर्गिक आहे त्यांची जपणूक, ज्या संस्कारांच आवश्यकता ज्या ज्या योग्य वेळी व्हावयाला हवी त्याचे सामाजिक नियम व पद्धती आखून दिली होती. १६ संस्कार हे त्याचे उदाहरण होय.

एव्हढेच नव्हे तर मृत्यूनंतरही त्या आत्म्याच्या पुढच्या प्रवासाबद्दल विश्वास वा ज्ञान होते त्याबद्दलची पद्धतशीर आखणी होती.

असे पुष्कळ गुणवर्णन करता येईल. पण काय उपयोग कारण भारतीयांचा या पद्धतीवरचा विश्वास उडवण्यात इतर भौतिक वा रानटी, पशूवत संस्कृत्या यशस्वी ठरल्या आहेत व भारतीयच आपल्या संस्कृतीबद्दल अनुत्सूक आहेत

'Musical Epistemology' असे निराळे पॅराडिम एका युरोपियन शास्त्रज्ञाने मांडले आहे. ह्याचा थोडक्यात तपशील असा की ज्ञानाच्या यशस्वी संक्रमणात शब्द, पुस्तके, संहिता, गद्य यापेक्षाही संगीतमय शब्द हे जास्त प्रभावी आहेत.

इथेही भगवद्गीतेत ब्रह्मज्ञान सांगण्यासाठी भगवान कृष्णाने गीता गायली आहे व कृष्ण म्हणतात की मी चार वेदामध्ये 'सामवेद आहे'. सामवेदी गायनाच्या पद्धती व मानही आज लुप्त झाले आहे.

तेव्हा खेदाचा सूर न लांवता अशी आशा करूया की ह्या श्रेष्ठ शिक्षणपद्धतीला उजाळा देऊन भारताला व विश्वाला विश्वाच्या या गूढ चक्रव्यूहातून व मानवाला त्याच्या शैक्षणिक गुलामगिरीतून खरी मुक्तता मिळो व खऱ्या चिरंतन सुखाची, आनंदाची, ज्ञानाची प्राप्ती होवो.

**यशवंत साने**

E-mail : yrsane@bol.net.in

# जागो भारत

*स्वातंत्र्याच्या दिवशी आमच्या विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथ नाट्याची ही संहिता. विचारांची प्रभावी अभिव्यक्ती लक्षात घेता अपवाद म्हणून हिंदीत असूनही संहिता या लेखात देत आहोत. - संपादक*

'यूनान मिश्र, रोम सब मिट गए जहाँ से,
क्या बात है की हस्ती मिटती नही हमारी ।
क्या बात है की हस्ती मिटती नही हमारी,
सदियों रहा है दुश्मन दौरे जहाँ हमारा ।'

किसी शायर ने क्या खूब कहा है की, आज यूनान, मिश्र, रोम सभी समाप्त हो गए है । वह प्राचीन वैभव और शान जो इन देशों को प्राप्त थी, समाप्त हो चुकी है । भारत के तो 'खण्डहर बता रहे है की इमारत बुलन्द थी ।'

भारतवर्ष सदियों तक गुलामी के बन्धनोंमे जकडा रहा । एक के पश्चात एक शासक एवं लुटेरोंने इसकी बहुमूल्य निधी को लूटा एवं आँधीके झोंके के समान आए तथा चले गए । यहीं नही प्राचीन कालमें 'सोने की चिडिया' कहा जानेवाला हमारा देश विदेशियोंने खोखला कर दिया था । वर्षोंसे छेडा गया स्वतंत्रता आन्दोलन एवं अन्य स्वतंत्रता सेनानियोंके स्वप्न साकार हुए और देश का कोना-कोना खुशी के वातावरण से गूँज उठा ।

शताब्दियों के पश्चात १५ अगस्त १९४७ को भारत स्वतंत्र हुआ और देश के संविधानका श्री गणेश हुआ । विधान परिषद ने लगभग ३ वर्षो का समय लगाकर ६४ लाख रुपया खर्च करके स्वतंत्र भारत के संविधान को तैयार किया । यह संविधान २६ जनवरी १९५० से संपूर्ण भारत में प्रभावी कर दिया गया ।

नये संविधान के अनुसार हमारे राष्ट्र को सम्पूर्ण प्रभुत्व सम्पन्न जनतन्त्रात्मक गणराज्य का स्वरूप प्रदान किया गया है । इसमे कुल ३९५ धाराएँ है । इसका स्वरूप संघीय है, जिसमें एक केन्द्रिय तथा उसके अन्तर्गत अन्य राज्य सरकारों की व्यवस्था है । संविधन में हमारे मूल अधिकारों एवं कर्तव्यों का वर्णन है । इसके पश्चात देश की समृद्धि को ध्यानमें रखते हुए कई कानून बनाए गए । इतनी कठिनाइयों और संघर्षो का सामना करने के बावजूद हमने अपनी मूल संस्कृती और परम्परा को आज भी संजोह कर रखा है ।

किसी ने ठिक ही कहा है -

धन्य ही भारतवर्षम्
धनया भारत संस्कृती
भारतिया: जना: धन्या:
धन्यास्माकं परम्परा ।

अर्थात् -

धन्य है भारतवर्ष, धन्य है भारत की संस्कृती, भारत का जन जन धन्य है, धन्य है हमारी परम्परा ।'

दोस्तो, प्रश्न ये उठता है की, क्या आजकी डोलती व्यवस्था में कहीं इस श्लोक की गरीमा घट तो नही गई?

आज की व्यवस्था का नाट्य रूपांतर आपके समक्ष प्रस्तुत है ।

पार्श्वभूमी - एक लडकी जमीनपर पडी हुई है ।

एक लडका आता है ।

लडका : (घबराकर) लाश, लाश...
कोई है? कोई है? शायद कोई नही है यहाँपर ।

लाश - पोलिस -गहनोइसिकी बॅग में ।

(सारे गहने निकालकर बॅग मे डालता है और उठता है )

(जाते जाते...)

कितनी अच्छी है, मरते मरते भी भला कर गई । चलो चलते है ।

(थोडी देर के बाद एक भिखारन आती है ।)

लाश को देखकर

भिखारन : हे भगवान लाश, अब क्या करूँ?

(स्वगत) दो दिनसे कुछ खाया भी नहीं है । एक काम हो सकता है ।

(भिखारन निचे रूमाल बिछाती है और लडकीके बाजूमें बैठकर रोना चालू करती है । एक औरत को पाससे गुजरते हुए देख उसे बोलती है )

ए मॅडम दो दिनसे कुछ खाया नही है । कमसे कम बहन के अन्तिम संस्कार तो करूँ, कुछ तो देना मॅडम ।

(और पैसे देकर चली जाती है ।)

हे भगवान ये क्या हो गया है ।

(इतनेमे एक आदमी को आते देख उसे बोलती है )

अल्ला के नामपे कुछ तो दो ना साहब,

हाय मेरी बहन..., भगवान तेरा भला करेगा साहब ।

(आदमी उसे पैसे देता है, और जाने लगता है ।)

आठ आने से क्या होता है साहब, कुछ तो देना।

(वो आदमी थोडे और पैसे देकर चला जाता है ।

भिखारन पैसे उठाते हुए बोलती है...)

हाँ कुछ तो कमाई हुई, दो दिन का दानापानी तो निकल गया । भगवान तेरी आत्मा को शांती दे ।

(भिखारन खुशीमें वहाँ से निकल जाती है ।)

(थोडी देर के बाद दो लडके वहाँ से गुजरते है । उस लडकीको देखकर एक लडका दुसरेको बोलता है )

पहला लडका : ए, ये देख लडकी । लगता है मर चुकी है ।

दुसरा लडका : चल यार, पुलिसको बताते है ।

पहला लडका : पुलिस? पागल है क्या? पुलिस के झमेलेमें कौन पडेगा ? चलए छोड दे, भागते है ।

दुसरा लडका : चल, चल ।

(दोनो लडके वहाँ से भागते है ।)

(बादमे दो लडकियाँ वहाँसे गुजरती है । उस लडकीको देखकर एक लडकी दुसरीको वो लडकी देखकर पुछती है)

पहली लडकी - ए, ये क्या है ?

दुसरी लडकी - लगता है मर चुकी है ।

पहली लडकी - चल देखते है, बेहोश भी तो हो सकती है ।

(दोनो उसके पास जाती है । पाससे जाते हुए दो लडको देखकर उन्हे आवाज देकर बुलाती है ।)

एक्सक्यूजमी भाईसाहब, जरा मदद करेंगे?

(वो दोनो पास जाकर उनके बाजूमें बैठकी उस लडकीको देखते है । एक लडका दूसरे को बोलता है )

एक लडका : ए पानी ला, पानी ला ।

(दुसरा लडका दौडकर जाने पानी लेके आता है और पहले लडके के हातमें देता है । वो थोडा पानी उस लडकीके मूँहपर डालता है । इसके बादभी लडकी उठती नही और फिर एक लडका दूसरे को बोलता है)

एक लडका : ए चल चल ऑफिस के लिए देर हो रही है ।

दूसरा लडका : हाँ, हाँ, जाते जाते पोलिस को फोन कर देंगे, चल ।

(दोनो लडके उठकर चले जाते है ।)

**पहली लडकी** : चल हम भी चलते है ।

(दोनो लडकियाँ उठकर चली जाती है ।)

(थोडी देर के बाद जमिनपर पडी हुई लडकी अपना सर पकडके धीरे धीरे उठती है ।)

**लडकी** : ओह ! मेरा सर चकरा रहा है । मुझे ये क्या हो रहा है? कोई दिख भी नही रहाँ। हे भगवान, कुछ समझमेंभी नही आ रहा । (अपने हाथोंकी तरफ देखकर) हाय मेरे गहने, (अपने आजूबाजूमें देखते हुए ) मेरा बॅग?

हाय मै अब क्या करूँ ? क्या जमाना आया है, एक जख्मी इन्सान की मदद करने की बजाय उसका सारा सामान लूट कर ले गए ।

धन्य है ये समाज, धन्य है यहाँ के लोग।

(पांच लोग अपना सर झुकाए बैठे है।)

(दो लोग उठते हुए -)

**दो लोग** : जागो, जागो के तुम हजार साल सो चुके।

(दुसरे दो लोग उठते हुए -)

**दो लोग** : जागो के तुम हजार साल खो चुके ।

पहला : जहान सब सजग सचेत आज तो

**दुसरा** : कदीम कौन नस्ल को हिसाब दो ।

**तिसरा** : जागो स्वदेश के लिए स्वराज दो ।

**चौथा** : जागो वतन के लिए कसो कमर ।

(पांचवा उठते हुए ...)

**पांचवा** : है दुश्मन हर मोड पर खडा हुआ है निशान जंग का गडा हुआ ।

**सब साथमें** : मिटो - मिटो, मगर लगे ना दाग देश पर।

(थोडी देर के बाद)

**पहला** : इसके लिए कौन जिम्मेदार है ? समाज या न्यायव्यवस्था

**दुसरा** : नही, शायद हम खुद । इतने कानूनों के बावजूद इतनी दुर्दशा? क्या सिर्फ कानून बना देने से समस्याओंका समाधान हो सकता है ? नहीं ।

तिसरा : एक सुदृढ, सक्षम राष्ट्र के लिए हर एक इन्सान को अपने कर्तव्यों का पालन करना होगा ।

**चौथा** : हमारा यहाँ मौजूद सभी लोगोंसे आग्रह है की, अपनी जिम्मेदारीयोंको समझे।

**पांचवा** : क्योंकि हमे हमारी आनेवाली पिढियों को जवाब देना होगा । और हां, ये याद रखना -

**सब साथमें** : ये वक्त ना ठहरा है, ये वक्त ना ठहरेगा।
यूँही वक्त ना ठहरेगा ।

यूँही ये गूजर जाएगा, घबराना कैसा ।
हिम्मत से काम लेंगे, घबराना कैसा।

जब कदम बढाए है, मंजिल मिल जाएगी ।

जब कदम बढाए है, मंजिल मिल जाएगी ।

पर राह जरा मुश्किल, घबराना कैसा ।
हिम्मत से काम लेंगे, घबराना कैसा ।
हिम्मत से काम लेंगे, घबराना कैसा ।

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्यामंदिरात सण व उत्सव प्रदर्शन

अगदी माँटेसरीच्या विद्यार्थ्यांपासून ते पुढील सर्व थरातील विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच भारतीय परंपरांची, भारतीय संस्कृतीची व्यवस्थित माहिती व्हावी या उद्देशाने डॉ. बेडेकर विद्यामंदिर, पूर्व प्राथमिक विभागातर्फे शाळेच्या विद्यालंकार सभागृहात 'सण व उत्सव प्रकल्प - २००४-०५' या प्रदर्शनाचे आयोजन केले होते.

संस्थेच्या मॅनेजिंग कमिटीचे कार्यवाह व पुढे १९८८ ते ९० या काळातील कार्याध्यक्ष माधव नामदेव पाटील यांच्या हस्ते शुक्रवार दि. ८ ऑक्टोबर रोजी सकाळी या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

हिंदू धर्मात निरनिराळे सण, उत्सव, व्रते व अनेक उत्तम नित्यकर्मे सांगितली आहेत. रोजच्या धकाधकीच्या जीवनात काही काळ विरंगुळा आणि दुरावला जाणारा नातेसंबंध दृढ होण्यासाठी सण साजरे करणे अत्यावश्यक आहे. सण हे आपल्या भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग आहेत. त्यामागे विचार, हेतू, तत्त्व, तर्क होते. आज तत्त्व हरवून गेले आहे. तत्त्वशून्य सण उरले आहेत. अशाने संस्कृती कशी टिकेल? या सणाबद्दलच्या तत्त्वाचा मागोवा घ्यायला हवा. मानवी मनामनात त्याद्वारे समाजात आणि त्यांच्या राष्ट्रात उत्साह, आनंद निर्माण करणे हा आपला हिंदूधर्म! या दृष्टीकोनातून या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. बेडेकर विद्यामंदिरमधील हे प्रदर्शन पहाण्यासाठी सभागृहात प्रवेश करताच हिंदू धर्मातील नववर्षाच्या चैत्रगुढीपाडव्याने मन प्रसन्न व प्रफुल्लीत होते. चैत्र, वैशाख, ज्येष्ठ, आषाढ महिन्यातील सण उदा. चैत्रगौर, हनुमान जयंती, रामनवमी, रेणुका देवीचा उत्सव (चैत्र), वैशाख पौर्णिमा, अक्षयतृतीया, नृसिंह जयंती, परशुराम जयंती, शिवजयंती, वेताळाची जत्रा (वैशाख), वटपौर्णिमा, दशहराव्रत (गंगापूजन), जगन्नाथ रथयात्रा, आषाढी एकादशी, मरीआईचा उत्सव (आषाढ), गुरुपौर्णिमा, दीपपूजन इत्यादी सणांची सविस्तर माहिती त्या त्या सणांची चित्रे उभी करून प्रात्यक्षिकांद्वारे मांडण्यात आली होती.

आपल्या भारतीय संस्कृतीचे हिंदू सण व उत्सव यासारख्या संस्कारीत कार्यक्रमाचे आयोजन केल्यास पालकांना व विद्यार्थ्यांना त्याचे उत्तम ज्ञान मिळेल. लहान मुलांना हिंदू सणांचे लवकरात लवकर आकलन होईल व या उत्तम ज्ञान मिळेल. लहान मुलांना हिंदू सणांचे लवकरात लवकर आकलन होईल व या उत्तम ज्ञानात भर पडावी हा या सण व उत्सव प्रकल्पामागील मुख्य हेतू होता.

या प्रदर्शनासाठी पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. विदुली वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षिका सौ. श्वेता कोकीळ, सौ. पूर्वा खरे, सौ. सीमा केळकर, सौ. सुप्रिया जोशी, सौ. अंजली पटवर्धन, सौ. नेहा जोगळेकर, सौ. सुलक्षणा पाध्ये, सौ. मनाली दिवेकर, सौ. सुचिता सराफ, सौ. केतकी अंबिके, सौ. शिल्पा पणशीकर-लेखनिक, पालक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी भरपूर मेहनत घेतली.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील मॅथेमॅटिक्स क्लबचे उद्घाटन

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील मॅथेमॅटिक्स क्लब (गणित मंडळ)चे उद्घाटन दि. ४ सप्टेंबर २००४ रोजी सेंट झेवियर्स कॉलेजचे निवृत्त प्राध्यापक आणि प्रसिद्ध गणिततज्ज्ञ डॉ. जी.डी. पडुकोन यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बांदोडकर महाविद्यालयाच्या




प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर डॉ. पडुकोन यांचे स्वागत करताना. डाव्या बाजूस उपप्राचार्या प्रा.सौ. अकोलकर व उजवीकडे प्रा. पोद्दार सर

प्राचार्या डॉ. एम.के.पेजावर यांनी भूषविले.

कार्यक्रमाची सुरुवात तृतीय वर्ष गणित विषयाचा विद्यार्थी अतुल सिंग याने सर्वांचे स्वागत करून केली. तृतीय वर्ष गणित विषयाचाच विद्यार्थी संतोष साळुंखे याने गणित मंडळाचा मागील दोन वर्षाचा आढावा घेतला.

बांदोडकर महाविद्यालयाचे गणित विभागप्रमुख प्रा. आर. एस.पोतदार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. गणित विषयातल्या रंजक गोष्टी रोचकरितीने प्रात्यक्षिकांसहीत डॉ. पडुकोन यांनी या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी सांगितल्या. महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी डॉ. पडुकोन यांच्या व्याख्यानाचा लाभ घेतला. कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तृतीय वर्ष गणित विषयांची तजीन काझी हिने सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## विद्याप्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील ग्रंथालयात पाठ्यपुस्तक प्रदर्शन

ग्रंथालयातील पुस्तकाची माहिती व्हावी, ग्रंथालयाविषयी आपुलकी निर्माण व्हावी, या दृष्टीने विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील ग्रंथालयात या शैक्षणिक वर्षात ग्रंथालयातील पाठ्यपुस्तकाविषयी (टेक्स्ट बुक्स) १ सप्टेंबर २००४ रोजी एक दिवसाचे प्रदर्शन भरविले होते.

पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि.कृ. नायक यांच्या हस्ते झाले. यात विद्यार्थ्यांकडून न वापरलेली काही पुस्तकेही 'Hello readers, we are also in the library please use us' या विभागात प्रदर्शित केली होती.



वि.प्र.मंडळाच्या तंत्रनिकेतनातील पाठ्यपुस्तक चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करताना प्राचार्य नायक सर

त्याचप्रमाणे ग्रंथालयात नवीन आलेली पुस्तकेही ठेवलेली होती. प्रत्येक विषयाप्रमाणे ही सर्व पाठ्यपुस्तके मांडलेली होती. काही संदर्भ ग्रंथही विद्यार्थ्यांना परिचित व्हावी या दृष्टीने ठेवलेले होते. ग्रंथालयातील पुस्तकांप्रमाणेच ग्रंथाली प्रकाशनातर्फे एक छोटेसे पुस्तकांचे प्रदर्शनही आयोजित केले होते.

इतर महाविद्यालयाचे आणि तंत्रनिकेतनातील विद्यार्थी व स्टाफनेही या प्रदर्शनास भेट दिली. त्यापैकी यात ग्रंथपाल मोहन पाठक (विज्ञान महाविद्यालय) व नारायण बारसे (कला व वाणिज्य महाविद्यालय) हे होते.

पुस्तक प्रदर्शनासाठी विद्यार्थी व ग्रंथालय स्टाफने मदत केल्याने हे प्रदर्शन यशस्वी झाले आणि विद्यार्थ्यांच्या उत्तम प्रतिसादामुळे पुस्तक प्रदर्शन भरविण्यास उत्साह निर्माण होतो असे मत सहाय्यक ग्रंथपाल सौ. भा.स.जोशी यांनी व्यक्त केले. या ग्रंथ प्रदर्शनामुळे अधिकाधिक विद्यार्थ्यांना ग्रंथाविषयी माहिती मिळण्यास मदत होते यात शंकाच नाही.



## ठाण्यात प्रथमच कायदेविषयक माहिती सांगणारे ग्रंथप्रदर्शन संपन्न

विद्या प्रसारक मंडळाचे, ठाणे म्युनिसिपल कार्पोरेशन विधी महाविद्यालयात विविध कायदेविषयक माहिती सांगणारे ग्रंथ प्रदर्शन दिनांक ५ आणि ६ ऑक्टोबर २००४ रोजी आयोजित करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन सायं ५.३० वा. विद्या प्रसारक मंडळाचे डॉ. विजय बेडेकर यांच्या शुभहस्ते महाविद्यालयाच्या वाचन कक्षात झाले. यावेळी प्रभारी प्राचार्या श्रीविद्या, बांदोडकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. माधुरी पेजावर, ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक उपस्थित होते.

सदर प्रदर्शनात मराठी, इंग्रजी या भाषेतील शेकडो ग्रंथ या प्रदर्शनात विद्यार्थी, प्राध्यापक व नागरिकांना प्रत्यक्ष पाहण्याची व चाळण्याची संधी मिळाली या ग्रंथ प्रदर्शनात अनेक कायदेविषयक ग्रंथ ठेवण्यात आले होते. उदा. कामगारविषयक कायदे, हिंदू विवाह कायदा, पर्यावरण कायदा, कायदेविषयक भाषा, कौटुंबिक कायदा, नुकसानीचा कायदा, भारतीय संविधान कायदा, कंपनी कायदा, संपत्तीविषयक कायदा, प्रशासकीय कायदा, जमिनीविषयक कायदे, दिवाणी प्रक्रिया संहिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, दस्तऐवजाचा कायदा व नमुने, भारतीय पुरावा कायदा, आंतरराष्ट्रीय कायदा व मानवाधिकार, दिवाणी दावे व दस्तऐवज वगैरे संबंधी माहिती, बँकिंग कायदा व व्यापार दस्तऐवज कायदा, विमा विषयक कायदे, महिला विषयक कायदे, शब्द कोश, कायदेविषयक कोश तसेच Intellectual Property Rights, Copyright, Patents, Trade Marks या विषयावरील कायदेविषयक ग्रंथ या प्रदर्शनात ठेवण्यात आले होते.

तसेच कायदेविषयक माहिती सांगणारी मासिके उदा. All India Reporter 1928 पासून ते 2004 पर्यंत, All India Reporters Manual, Hindu Law Reporter, Bombay Law Reporter, Criminal Law Journal, Divorce and Matrimonial Cases, Labour and Industrial Cases, Maharashtra Law Journals, Taxation Law Report, Transport and Accidents Cases, Supreme Court Digest, Constitutional Law of India, Labour Law Journal and Digest, Company New Reports, Corporate Law Cases, Sales Tax and Income Tax Journals and Halsbury's Law of England इत्यादी वैविध्यपूर्ण विविध विषयावरील कायदेविषयक ज्ञान रसिक वाचकांसाठी उपलब्ध करण्यात आले होते.

सर्व रसिक वाचकांनी तसेच ग्रंथप्रेमी नागरिकांनी, विविध स्तरातील वकील, कायद्याची पदवी घेणारे विद्यार्थी, प्रशासकीय सेवेतील कर्मचारी, प्राध्यापकवर्ग यांनी दोन दिवस चालणाऱ्या या ग्रंथ प्रदर्शनाचा कल्याण, डोंबिवली,

ठाणे या परिसरातील ग्रंथप्रेमी वाचकानी लाभ घेतला. या प्रदर्शनास महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीविद्या जयकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रंथालय प्रमुख श्री. संजय सकपाळ, विद्यार्थी प्रतिनिधी गोपीचंद खाडे, धनंजय भोसले आणि विरेश पवार आदी विद्यार्थी प्रतिनिधींनी हे प्रदर्शन आयोजित करण्यास अथक परिश्रम घेतले.

## सौ. आनंदीबाई केशव जोशी स्कूल

सौ. आनंदीबाई केशव जोशी स्कूल यांनी आयोजित केलेले अभ्यासाला पूरक ठरतील असे व अभ्यासेतर उपक्रम.

१. इ. ५ वी - प्रकल्प भेट - आयमॅक्स थिएटर, नेहरू प्लॅनेटोरियम, पार्ले ग्लुकोज बिस्किट फॅक्टरी.

२. भाग्यश्री फडके - ६ अ - पर्यावरण दक्षता मंच, ठाणे आयोजित चित्रकला स्पर्धेत ७०० विद्यार्थ्यांतून द्वितीय क्रमांक.

३. रोट्रॅक्ट क्लब आयोजित सूर २००४ संगीत स्पर्धेत पाश्चात्य संगीत विभागात सुरभी गोखले द्वितीय पारितोषिक आणि तन्मय सिन्नरकर तृतीय पारितोषिक उपशास्त्रीय विभागात आदित्य कानविंदे यास द्वितीय पारितोषिक.

४. महाराष्ट्र कराटे असोसिएशन आयोजित कराटे स्पर्धेत चैतन्य काळे - ९ वी क यास ताम्रपदक आणि राज्यस्तर स्पर्धेसाठी निवड.

५. लीग फॉर एक्सचेंज ऑफ कॉमनवेल्थ टीचर्स यांच्यातर्फे आमच्या शाळेच्या शिक्षिका सौ. मेधा लाड या लंडन (न्यू हॅम) येथे तेथील शाळांचे निरीक्षण करण्यासाठी व तेथील नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याठी ८ ऑक्टोबर २००४ रोजी १० दिवसांच्या दौऱ्यासाठी रवाना झाल्या.

६. अंबरनाथ येथे आयोजित केलेल्या जॅक-यॉन-डो स्पर्धेत रीचा टिपणीस ८ वी ब हिला रजत आणि जुही बजाज ७ वी अ हिला ताम्रपदक मिळाले.

७. आमच्या शाळेच्या "खाऱ्या पाण्याचा शेतीसाठी उपयोग" या प्रकल्पाची राज्यस्तरावर निवड -

प्रथम ह्या प्रकल्पाची १४० प्रकल्पांतून तालुका स्तरासाठी व ८५ प्रकल्पांतून जिल्हास्तरासाठी निवड झाली.

मार्गदर्शक शिक्षक व भाग घेणारे विद्यार्थी

शिक्षक - सौ. पौर्णिमा साठे
सौ. नमिता जोशी

विद्यार्थी - सोनिया कारापूरकर (गटप्रमुख)
रिचा टिपणीस
आदित्य कानविंदे
श्रीनिवास घरोटे

- संकलित

दिशा नियमित वाचा.
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.